कृषीवल

रायगड ॥ शुक्रवार, दिनांक २४ जून २०२२

किंमत ४ ₹

दिलीप जाधव

। मुंबई । राज्यातील सत्तासंघर्ष शिगेला पोहोचला असून, शिवसेना आणि बंडखोरांनी परस्परांना आव्हाने, प्रतिआव्हाने दिली आहेत. मविआमधून बाहेर पडा या मागणीवर बंडखोर ठाम आहेत तर मविआमधून बाहेर पडायला आम्ही तयार आहोत पण तुम्ही ते मुंबईत येऊन जाहीर करा, असे प्रतिआव्हान शिवसेनेने दिलेले आहे. उद्भवलेल्या परिस्थितीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मागे ठाम राहण्याचा निर्धार काँग्रेस, राष्ट्रवादीने व्यक्त केला आहे. बंडखोरांनी विधिमंडळात येऊन बहुमत आहे की नाही हे सिद्ध करावे, असे आवाहन राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. तर निधी वाटपात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दुजाभाव केला असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

‘समोर येऊन बोला’

। मुंबई । प्रतिनिधी ।

गुवाहाटी येथे तळ ठोकून असलेले बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांनी आपल्याकडे असलेल्या आमदारांसह शक्तीप्रदर्शन केले आहे. आपल्यासोबत असलेल्या आमदारांची घोषणा केली आहे. शिंदे यांच्यासोबत शिवसेनेचे ३७ आमदार असल्याचा दावा केला जात आहे तर ९ अपक्ष आमदार सोबत असल्याचा देखील दावा केला जात आहे.

एकनाथ शिंदे यांनी गुवाहाटीमध्ये शक्तिप्रदर्शन केले आहे. याचा एक व्हिडिओ समोर आला आहे. एकनाथ शिंदे यांच्यासोबत अपक्षांसह ४२ आमदार असल्याचे व्हिडिओत दिसत आहे. त्यामुळे आता आगामी दिवसात मोठ्या राजकीय हालचाली होण्याची शक्यता आहे. •> पान २ वर

‘गटनेता निवडीचा अधिकार पक्षप्रमुखाला’

कायद्यात पक्षप्रमुखाने गटनेता निवडायचा असतो आणि गटनेत्याने प्रतोद निवडायचा असतो. याप्रमाणे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आधी एकनाथ शिंदे यांना गटनेतेपदी निवडलं होतं, त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्याऐवजी अजय चौधरी यांना गटनेतेपदी नियुक्तीचं पत्र दिलं, अशी माहिती नरहरी झिरवळ यांनी दिली.

विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ म्हणाले, देशमुखांनी ते सुरतला होते असं सांगितलं, पण आता ते त्यांच्या गावी आहेत. त्यांनी मी इंग्रजी सही करतो मात्र पत्रावरील सही मराठी आहे.

बहुमत सिद्ध करण्याचा पवारांना विश्वास

राज्यातील शिवसेनेच्या बंडखोर आमदारांनी विधिमंडळात येवून सरकारकडे बहुमत आहे की नाही हे सिद्ध करावे, असे आवाहन राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे.

उद्भवलेल्या राजकीय परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी गुरुवारी राष्ट्रवादीच्या आमदारांची बैठक घेतली. त्यानंतर सायंकाळी पत्रकारांशी बोलताना गुवाहाटीला गेलेले सर्वच आमदार मुंबईत परतल्यानंतर पुन्हा सरकारमध्ये सहभागी होतील. आपल्याकडे किती आमदार आहेत हे सभागृहात सिद्ध करावे, असे ते म्हणाले. आपल्याला एका राष्ट्रीय पक्षाचा पाठिंबा आहे, असे शिंदे यांनी जाहीर केले आहे. तो पक्ष म्हणजे भाजपच आहे असेही पवार यांनी जाहीर केले. गुवाहाटीमध्ये बंडखोरांना मदत कोण करत होते. हे राज्याने पाहिले आहे. असे त्यांनी निदर्शनात आणले.

पवार यांची मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंसोबत चर्चा झाली. यामध्ये कठोर भूमिका घेण्याचा सल्ला देतानाच राष्ट्रवादीचा पाठिंबा शिवसेनेला कायम राहील असं म्हटलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पूर्णपणे आपल्या पाठीशी आहे असा विश्वास पवारांनी उद्धव ठाकरेंना दिल्याचं सूत्रांनी म्हटलंय.

निधी वाटपावरुन काँग्रेस-राष्ट्रवादीत आरोप

राज्यातील मविआ सरकारच्या काळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून निधीवाटपात काँग्रेसवरही अन्याय झाल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांनीही असाच आरोप केलेला होता. आता काँग्रेसनेही त्यात सूर लावल्याने राष्ट्रवादी बाबत नाराजी व्यक्त होत आहे. अजित पवार यानी मात्र पटोले यांच्या आरोपांचे खंडन करताना अडीच वर्षात सर्वाना योग्य प्रमाणात निधी दिल्याचे म्हटले आहे.

महाडमध्ये गोगावले समर्थकांची बॅनरबाजी

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर पोलादपूरपासून ११ कि.मी.अंतरावर राजेवाडी, पुणे, भोर, वरंध घाटाच्या रस्त्यालगत राज्यातील महाविकास आघाडीतील राजकीय घडामोडींसंदर्भात पहिला राजकीय बॅनर झळकला आहे. या बॅनरवर राज्याचे मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची प्रतिमा नसून बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे आणि एकनाथ शिंदे यांची छायाचित्रे आकर्षक आणि लक्ष्यवेधी ठरत आहेत. या बॅनरवरून एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांच्यासोबतच्या सर्व आमदारांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

आ.भरत गोगावले यांची एकनाथ शिंदे समर्थक गटाच्या विधिमंडळ प्रतोदपदी निवड झाली असून त्यांचे निवासस्थान असलेल्या •> पान २ वर

मविआमधून बाहेर पडू पण...

राज्यातील महाविकास आघाडीमधून बाहेर पडायला शिवसेना तयार आहे. बंडखोरांनी मुंबईतून मुख्यमंत्र्यांसमोर येऊन सांगावे असे थेट आव्हान शिवसेना नेते खा. संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेना दिले आहे. या बंडाला कोणाची साथ आहे हे अवघ्या महाराष्ट्राला माहिती आहे. त्यामुळे जर मविआ नकोच असेल तर समोरासमोर येऊन बोला. चर्चेतून मार्ग काढू असे बाहेर राहून प्रसार माध्यमांतून आम्हाला धमकी देऊ नका, असे राऊत यांनी बंडखोरांना निक्षुन बजावले आहे. या संकटावर मात करण्यासाठी हिंमत शिवसेनामध्ये आहे. हे बंडखोरांनी लक्षात ठेवावे.

महत्त्वाचे

गतिमंद तरुणीवर बलात्कार

पाली : सुधागड तालुक्यातील पोटलज खुर्द गावात एका गतिमंद तरुणीवर बुधवारी बलात्कार झाल्याची घटना घडली आहे. याबाबत पाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोटलज खुर्द येथे राहणारी २४ वर्षीय गतिमंद तरुणी घराच्या पायरीवर बसली होती. आरोपीने तिला एका बंद घराच्या व्हरांड्यात नेऊन बलात्कार केला. याप्रकरणी पाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक तृप्ती बोराटे तपास करीत आहेत.

घरावर झाड कोसळले

माथेरान : माथेरानमध्ये गुरुवारी दुपारी अनंता मोरे यांच्या घरावर मोठाले झाड कोसळले. सर्वजण घरात असताना अचानकपणे असाना जातीच्या झाडाची मोठी फांदी घरावर कोसळली. यामध्ये घराच्या भिंतीच्या दगडी कोसळल्या. त्यातील एक दगड लागून महिला जखमी झाली. जीवितहानी झाली नसली तरी घरातील सर्वच सामानाचे फार मोठे नुकसान झाले आहे. शामक बंगला (बाटली बॉय) येथे माळी कामगार म्हणून राहत असलेल्या घरावर हे झाड कोसळले. दुपारची वेळ असल्याने घरातच असलेल्या उर्मिला उमेश मोरे हिच्या डोक्याला दगडाचा मार लागला आहे. तिला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे. स्थानिक शैलेंद्र दळवी, दत्ता सनगरे, वैभव परब, परशुराम घुटे आणि परशुराम पांगसे, विजय चौहान आदींनी घरावरील झाड बाजूला करण्यास मदत केली.

ब्रिटीशकालीन दोन पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट नाही

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

ब्रिटीश कालीन वास्तूरचना किती प्रगल्भ होती. हे आजही दिमाखात उभ्या असलेल्या वास्तूंवरुन दिसून येते. रायगड जिल्ह्यांमध्ये ब्रिटीशांच्या कालावधीतील वास्तू आहेत. पैकी नागोठणे येथील आंबा नदीवरील पूल आणि पनवेल तालुक्यातील तारापूर पूलांचे स्ट्रक्टरल ऑडिटच झालेले नाही. तर पोलादपूर तालुक्यातील चोलई पूल, मोरगील पूल, शिंगडी पूल आणि घोडवली पूलाला आपत्तीचा फटका बसल्यास या पूलांवरून पर्यायी वाहतुकीचा मार्गच नसल्याने हजारो गावांचा संपर्क तुटण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

पावसाला सुरुवात झालेली आहे. गेल्या काही वर्षात रायगड जिल्ह्यावर विविध आपत्ती ओढवल्या आहेत. दरवर्षी साडेतीन हजार मिमी पावसाची नोंद होते. जिल्ह्यामध्ये तुफान पाऊस पडतो. धरणांची संख्या कमी असल्याने तसेच अस्तित्वात असलेल्या नद्यांमधील गाळ पूर्ण क्षमतेने न काढल्याने नदी काठी असणाऱ्या गावांना महापुराच्या पाण्याचा फटका हमखास बसतो हे. गेल्या काही वर्षात आलेल्या आपत्तीवरून दिसून येते. जिल्ह्यात आलेल्या महापुरामुळे छोट-मोठ्या पूलांचे प्रचंड नुकसान झाले आहे. काही पुल तर महापुराच्या पाण्यात वाहून गेले आहेत. त्यामध्ये महाड तालुक्यीतील सावित्री नदीवरील पुलाचा समावेश आहे. हा पुल कोसळल्याने •> पान २ वर

चार पूल बंद पडल्यास संपर्क तुटणार



तर हजारो गावे संपर्कहिन

नागोठणे येथील आंबा नदीवरील पूल १८८० साली बांधण्यात आला आहे, तर पनवेल तालुक्यातील तारापूर येथील पुल हा देखील ब्रिटीश कालावाधीतच उभारण्यात आला होता. या दोन्ही पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आलेले नाही. पावसाळ्यामध्ये नागोठणे आणि अलिबाग तालुक्यातील आक्षी पुलावरील वाहतुक बंद ठेवावी लागणार आहे. चोलई, मोरगील शिंगटी आणि घोडवली या पोलादपूर तालुक्यातील पुल बंद पडल्यास पर्यायी वाहतुकीचा मार्गच नाही. त्यामुळे हजारो गावांचा संपर्क तुटणार आहे.

पेणचा प्रभारी बीडीओ लाच घेताना अटकेत

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी एम.एन. गढरी यांना अलिबाग लाच लुचपत विभागाने रुपये १५ हजारांची लाच स्विकारताना रंगेहाथ पकडले आहे.

पंचायत समितीमध्ये कार्यरत असलेले ग्रामसेवक यांची अलिबाग जिल्हा परिषदेत बदली करण्याकरिता अहवाल रायगड जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्याकडे पाठविण्यासाठी प्रभारी गटविकास अधिकारी एम.एन.गढरी यांनी तक्रारदार ग्रामसेवक यांच्याकडून २० एप्रिल २०२२ रोजी २० हजार रूपयांची मागणी केली. त्यामुळे संबंधित तक्रारदार यांनी प्रभारी गटविकास अधिकारी •> पान २ वर

महाड पालिकेची अतिक्रमणावर कारवाई

। महाड । प्रतिनिधी ।

महाड नगर पालिकेच्या बांधकाम विभागाने गुरुवारी शहरामध्ये असलेल्या अतिक्रमणावर कारवाई केली असून रस्त्यावर उभ्या केलेल्या अनधिकृत टपऱ्या आणि दुकानासमोरील शेडवर जेसीबीचालवून कारवाई केली आहे. ही कारवाई शहरामध्ये दोन दिवस चालणार असल्याची माहिती महाड नगरपालिकेचे अभियंता सुहास कांबळे यांनी दिली.

शहरात विविध भागात अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे दिवसेंदिवस वाढत असून गेली अनेक वर्ष तुटपुंज्या कारवाया केल्या जात होत्या. शहरातील मुख्य रस्त्यांवर पदपथावर लागणाऱ्या हातगाड्या, टपऱ्या यामुळे सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. याबाबत ठोस कारवाई होत नसल्याने शहरात विविध भागात अनधिकृत बांधकामे वाढत आहेत याबाबत अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई करत जे.सी.बी. लावून दुकानासमोरील शेड, टपऱ्या हटवण्यात आल्या. •> पान २ वर

छोट्या व्यवसायावर हातोडा; धनदांडग्यांना संरक्षण

रायगडच्या सुपुत्रांची स्वातंत्र्याची अमृत परिक्रमा

भारत रांजणकर

। अलिबाग ।

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने देशभरात ‘स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव’ उत्साहात साजरा करण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील मुरुड जंजिरा येथील प्रसाद चौलकर आणि पनवेल येथील अभिजित सिंग कोहली हे दोन बाईकस्वार स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अनोख्या पद्धतीने साजरा करीत आहेत. मोटारसायकलवर भारत भ्रमण करून देशाच्या गौरवशाली ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाचे जगाला दर्शन घडवण्यासाठी हे दोघे बाईकस्वार देश भ्रमंतीसाठी निघाले आहेत.

सदरील ७५ दिवसांची परिक्रमा एकूण ३ टप्प्यात करण्यात येत आहे. परिक्रमेच्या दुसऱ्या पर्वाला दिनांक २० एप्रिल २०२२ रोजी पनवेल येथून सुरुवात झाली होती. गुजरात, राजस्थान, पंजाब, जम्मु काश्मीर, हिमाचल, उत्तराखंड इत्यादी राज्यातून प्रवास करून दिनांक ३ मे रोजी ती दिल्ली येथे पोहचली. भारत पर्यटन दिल्ली, पर्यटन मंत्रालय (भारत सरकार) तसेच एम्स दिल्ली या ठिकाणी बाईकस्वारांचे स्वागत करण्यात आले. यानंतर मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू केरळ इत्यादी १८ राज्य, ५ केंद्रशासित प्रदेश आणि ११,००० किलोमीटरची विक्रमी बाईक राइड करून दोघे बाईकस्वार दिनांक ३१ मे रोजी मुंबईत दाखल झाले. इंडिया टुरिझम मुंबई येथे त्यांचे स्वागत करून परिक्रमेचे दुसरे •> पान २ वर

७५ दिवसात २१००० किमी मोटारसायकल प्रवास

बाईक राइड करताना नेहमीच काहीतरी सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करीत असतो, प्रवास करीत असताना अनेक अपघात बघत असतो. त्यामुळे बाईक चालवताना हेल्मेट घालणे किती गरजेचे आहे ते लोकांना पटवून देणे महत्त्वाचे वाटते
– प्रसाद चौलकर, बाईकस्वार

पोटाची खळगी भरण्यासाठी शिडीचा आधार

। माथेरान । वार्ताहर ।

गावापासून छोट्या वाटेने दोन ते तीन तासांचा प्रवास, प्रचंड उभा चढाव, त्यातच अगदी पाय बसेल एवढीच पाऊलवाट आणि पुढे-पुढे अशक्यप्राय अशा पस्तीस ते चाळीस फूट उंचीच्या लाकडी शिड्या चढायच्या, हे सर्व करत असताना, आजूबाजूला खोल दरी, असा जीवघेणा प्रवास करत येथील आदिवासी बांधव वर्षानुवर्षे मोलमजुरीसाठी माथेरान गाठत आहेत. एखाद्या चित्रपटात शोभेल अशी, परंतु वास्तव कथा

॥ आदिवासी बांधवांच्या नशिबी यातनामय जीवन

॥ शासनाकडून दुर्लक्ष, अद्याप मदतीच्या प्रतीक्षेत

असून, येथील आदिवासींच्या नशिबी यातनामय जीवन आहे. परंतु, याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून, अद्याप मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.

रायगड जिल्ह्यातील जगप्रसिद्ध थंड हवेचे पर्यटनस्थळ म्हणजे माथेरान. याच माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या अनेक आदिवासी वाड्यांवर जाण्यासाठी चांगल्या स्थितीत रस्ते नाहीत.

यातील बहुतेक आदिवासी वाड्यातील बांधव आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी माथेरानला नियमितपणे येत असतात. कुणी मोलमजुरी, तर कुणी भाजीपाला, मासे प्रत्येक •> पान २ वर

आम्हाला पोटापाण्यासाठी, कामधंदा इतर गोष्टीसाठी माथेरानला यावे लागते. आमचे जीवन माथेरानवरच अवलंबून आहे. तरी आम्हाला येण्या-जाण्यासाठी लोखंडी शिडी कोणीतरी दानशूर व्यक्तीने पुढे येऊन बसवून द्यावी, ही आमची कळकळीची विनंती आहे.
– देहू पारधी, राजू उघडे, आदिवासी ग्रामस्थ

माथेरान गुजरात भवन हॉटेलचे मालक उमेश दुबल मित्र परिवाराने त्यांच्या दोन लोखंडी शिड्या बनवून दिल्या. परंतु, आदिवासी बांधवांना काही काळच त्यांचा उपयोग करता आला. कारण, २६ जुलै २०१९ च्या प्रचंड पावसामुळे त्या भागातील डेंजरपाथ पॉईंटवरील मोठाली दरड व माती वाहून गेल्यामुळे त्याच्या जोरदार प्रवाहामुळे संपूर्ण भागच नष्ट झाला. नवी शिडीदेखील वाहून गेली. पायवाट सुद्धा राहिली नाही. शेवटी श्रमदानातून येण्या-जाण्यासाठी एक लाकडी शिडी पायवाट करण्यात आली आहे. आणि याच पायवाटेने, लाकडी शिडीने अजूनही आदिवासी लोक येथून ये-जा करीत आहेत. याकडे शासनाने गांभीर्याने पाहावे, व तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ जून

१) श्री. प्रभाकर गायकवाड
२४-०६-१९५४
चेंढरे-अलिबाग.

२) श्री. अनिल त्रिभुवन
२४-०६-१९५०
चेंढरे, पंतनगर, अलिबाग.

३) श्री. प्रमोद उकडे
२४-०६-१९५५
नवेदर-नवगाव, अलिबाग.

नवघर उपसरपंचपदी परेश पाटील बिनविरोध

। उरण । वार्ताहर ।

नवघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी परेश पाटील यांची गुरुवारी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी जि.प. सदस्य विजय भोईर, विकास भोईर,सरपंच आरती चौगुले, गणेश वाजेकर, महादेव बंडा, ग्रामविकास अधिकारी किरण केणी, दिपक ठाकूर, सदस्य हितेश भोईर, सुरेश बंडा, दमयंती पाटील, सुमती बंडा, प्रीती तांडेल, भूपेंद्र कडू, चैताली पाटील, समाधान भोईर यांच्यासह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोगावलेंच्या भूमिकेने पोलादपूर शिवसेनेत दुफळी?

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

राज्यातील बदलत्या राजकारणाचे पडसाद आता गावपातळीवरही उमटण्याची शक्यता वर्तविली जात आहे. विशेष करुन महाड, पोलादपूर तालुक्यात आ. भरत गोगावले यांच्या बदलत्या भूमिकेने शिवसेनेत दुफळी पडण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

एकनाथ शिंदे यांच्यासोबत आ.गोगावले यांचा महत्वपूर्ण सहभाग पाहता राज्यातील राजकीय परिस्थिती शांत होऊन सत्तेचे चित्र स्पष्ट होईपर्यंत आ.गोगावले यांना त्यांच्या महाड व पोलादपूर मतदार संघाकडे लक्ष देता येणे शक्य नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे, शिवसैनिकांसह विविध राजकीय पक्षांनी वेट ॲण्ड वॉच भूमिकेतून मौन बाळगले असून कोणीही या अस्थिर राजकीय परिस्थितीचा लाभ घेण्याचा प्रयत्न करताना दिसून येत नाही.

पोलादपूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या दोन जागा आणि पोलादपूर पंचायत समितीच्या चार जागांसह वझरवाडी, तुर्भे खोंडा, तुर्भे बुद्रुक आणि तुर्भे खुर्द या चार ग्रामपंचायतींच्या निवडणुका होऊ घातल्या असून राज्यातील सत्ताबदलासह राजकीय समीकरणे बदलण्याच्या शक्यतेमुळे सर्वच राजकीय पक्ष एक अवाक्षरही या घडामोडींवर बोलण्यास उत्सुक नसल्याचे दिसून येत आहे.

आ.गोगावले यांनी घेतलेल्या भूमिकेला सत्तेशी आणि पक्षाशी बंडखोरी असे समजले जात असले तरी विधिमंडळ पक्ष म्हणून एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना म्हणून मान्यता मिळते अथवा कसे, यावरच या बंडखोरी अथवा पक्षनिष्ठेबाबत शिक्कामोर्तब होऊ शकणार असल्याने सद्यस्थितीत सर्वच राजकीय पक्ष मौन बाळगून असल्याचे दिसून येत आहेत.

अलिबाग येथे तपस्वी रामजी घरत यांना अभिवादन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

अलिबागचे थोर तपस्वी रामजी लक्ष्मण घरत यांच्या १६७ व्या जयंतीचे औचित्य साधून गुरूवारी (दि.२३ जून) सकाळी १०.३० वाजता जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष तसेच रायगड जिल्हा सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष ॲड.गौतम पाटील यांच्या हस्ते त्यांच्या अलिबाग येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. श्रीरंग घरत निमंत्रक, प्रशांत नाईक, मित्रमंडळ, पुतळा सुशोभिकरण समिती यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.

या कार्यक्रमास श्रीरंग घरत, निमंत्रक, नागेश कुलकर्णी, शरद कोरडे, चारूशिला कोरडे, नवीन राऊत, अरविंद घरत, बळवंत वालेकर, भालचंद्र वर्तक, हेमकांत सोनार, जगदिश नागे, मधुकर पाटील, कमळाकर राऊत, संजय कांबळे, सुधाकर राणे, पूजा काठे, साक्षी काठे, बाळू पवार, रमेश नाईक, नाईक (कार्ले), म्हात्रे (चेंढरे), गौरी, सार्वजनिक वाचनालयाचे कर्मचारी आदी उपस्थित होते.

पेझारी येथे विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबीर

। पेझारी । वार्ताहर ।

आदर्श शाळा पेझारी व रोटरी क्लब ऑफ अलिबाग सिशोअर यांच्या संयुक्त विद्यमाने अंतरराष्ट्रीय योगा दिन व विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन माजी आ. पंडित पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी जि.प.सभापती चित्रा पाटील, डॉ. राजेंद्र चांदोरकर रोटरी क्लब अध्यक्ष मनिष परब, डॉ. राजेश्री चांदोरकर, डॉ.अक्षय कोळी, सिम्पल मॅडम, डॉ.निलेश म्हात्रे, माधुरी म्हात्रे, प्रतीक पाटील गौरी चव्हाण, गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळे आदी उपस्थित होते.

शाळा विकास समितीचे अध्यक्ष सुरेश म्हात्रे, आरती थळे, नितीश पाटील आदींनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक नितीश पाटील यांनी केले.

यावेळी चित्रा पाटील यांनीही मार्गदर्शन केले. डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी दरवर्षी पेझारी शाळेतील अभ्यासाबरोबर सर्व ॲक्टिव्हिटीज मध्ये सहभागी होणाऱ्या दोन विद्यार्थ्यांची निवड दरवर्षी करण्यात यावी व त्यासाठी प्रोत्साहन म्हणून १० हजारांचा निधी मुख्याध्यापक श्री नितिश पाटील यांच्याकडे सुपूर्द केला अशाच प्रकारे पुढील तीन वर्ष १०,००० रुपये शाळेतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दिले जातील असे त्यांनी जाहीर केले. सूत्रसंचालन नीलिमा पाटील यांनी केले.

जिल्ह्यांत एकमेव शाळा अशी आहे की ज्या शाळेचा पट व गुणवत्ता हे दोन्ही वाढत आहे शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवणारा अलिबाग तालुक्यातील एक विद्यार्थी पेझारी झाले शाळेचा आहे. सर्व शिक्षकांचे व शाळा व्यवस्थापन समिती शाळा विकास समितीचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.
– पंडित पाटील, माजी आमदार

आ. बाळाराम पाटील यांच्यातर्फे पुस्तके वाटप

। पनवेल । प्रतिनिधी ।

विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करण्याच्या दृष्टीने त्यांना वाचण्यासाठी मोफत पुस्तके मिळावीत असा माझा मानस होता, असे आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले. ते २०२१-२२ च्या आमदार निधीतून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १३६ शाळांना २० लक्ष रुपये किमतीच्या पुस्तक संचाचे वाटप शरद कृषी भवन, ओरस येथे त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे नेते विकास सावंत, राष्ट्रवादीचे व्हिक्टर डॉन्टस, कणकवली नगरपरिषदेचे नगरसेवक अबिद नाईक यांच्यासह विविध मान्यवर, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५**

पान १ वरुन

गोगावले समर्थकांची बॅनरबाजी

ढालकाठीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत लावण्यात आलेला बॅनर सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. महाड, बिरवाडी, राजेवाडी, वरंध, पोलादपूर अशा प्रमुख शहरवजा गावांकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या मध्यवर्ती ठिकाणी लावलेल्या या बॅनरकडे वाहने आणि दुचाकी वाहनांतून जाणारे प्रवासी व स्थानिक जनता आवर्जून थांबून पाहात आहेत. दरम्यान, आज माध्यमांसमोर प्रतोद म्हणून आ.भरत गोगावले यांनी समर्थक आमदारांची यादी सादर केली असून त्यांचा मतदार संघ असलेल्या महाड विधानसभा क्षेत्रामध्ये संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

'समोर येऊन बोला'

बंडखोर आमदार

एकनाथ शिंदे, अनिल बाबर, शंभूराजे देसाई, महेश शिंदे, शहाजी पाटील, महेंद्र थोरवे, भरत गोगावले, महेंद्र दळवी, प्रकाश अबिटकर, डॉ. बालाजी किणीकर, ज्ञानराज चौगुले, प्रा. रमेश बोरनारे, तानाजी सावंत, संदीपान भुमरे, अब्दुल सत्तार नबी, प्रकाश सुर्वे, बालाजी कल्याणकर, संजय शिरसाट, प्रदीप जयस्वाल, संजय रायमुलकर, संजय गायकवाड, विश्वनाथ भोईर, शांताराम मोरे, श्रीनिवास वनगा, किशोरअप्पा पाटील, सुहास कांदे, चिमणआबा पाटील, लता सोनावणे, प्रताप सरनाईक, यामिनी जाधव, योगेश कदम, गुलाबराव पाटील, मंगेश कुडाळकर, सदा सरवणकर, दीपक केसरकर, दादा भुसे (सर्व शिवसेना), बच्चू कडू, राजकुमार पटेल, राजेंद्र यड्रावकर, चंद्रकांत पाटील, नरेंद्र भोंडेकर, किशोर जोरगेवार, मंजुळा गावित, विनोद अग्रवाल, गीता जैन (अपक्ष आमदार)

ब्रिटीशकालीन दोन पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट नाही

जिल्ह्यातील वापरात असलेल्या सर्व पुलांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झाला. त्यानंतर पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा मुद्दा प्रकर्षाने पुढे आला होता. पावसाळ्यात पनवेल-तारापूर, पोलादपूर-चोलई, मोरगील,शिंगटी, घोडवली, नागोठणे-आंबा नदी आणि अलिबाग तालुक्यातील खडताळ पुलावरून वाहतुक सुरु राहणार आहे. वाहतुक सुरु राहणार असल्याचा निर्वाळा सार्वजनिक बांधकाम विभागाने दिला आहे. त्यामुळे एखादा अपघात घडल्यास जबाबदारी देखील त्यांचीच राहणार असल्याचे स्पष्ट होते. चोलई, मोरगील, शिंगटी आणि घोडवली पुलांची दुरुस्ती २०१७-१८ या कालावधीत झाल्याचा दावा सार्वजनिक बांधकाम विभागाने केला आहे. पनवेल तालुक्यातील तारापूर येथील पुलांची दुरुस्ती झालेली नाही. कारण तो सुस्थितीत आहे. या पुलावरील वाहतुक बंद पडल्यास ९०० मीटरवर पर्यायी रस्ता आहे. काही पूलांचे काम सुरु करण्यात आलेले आहे, तर काही पूलांची पुर्नबांधणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सरकार आणि प्रशासनाने तातडीने यामध्ये लक्ष घालून जिल्ह्यातील पुलांची उत्तम उभारणी केल्यास जनतेच्या हिताचे ठरणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या म्हणण्यानुसार काही पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट झालेले नसले तरी, त्यातील काही पुलांची डागडुजी प्रस्तावित आहेत. पुल वापरण्यास चांगले आहेत. ज्या ठिकाणी पावसाळ्यात वाहतुक सुरु ठेवता येणार नाही. ते पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात येतील.

महाड पालिकेची अतिक्रमणावर कारवाई

या कारवाईबाबत एकीकडे समाधान व्यक्त केले जात असून दुसरीकडे मात्र धनदांडग्या लोकांनी केलेल्या अनधिकृत कामांना मात्र एकप्रकारे अभय देण्याचे काम केले जात आहे. काही ठिकाणी राजकीय हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न झाला.

शहरामधील सुमारे ५० ठिकाणी अतिक्रमणावर कारवाई केली जात असून दोन दिवस कारवाई मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या मोहिममध्ये नगरपालिका मुख्य अधिकारी महादेव रोडगे यांच्या समवेत नगर अभियंता सुहास कांबळे नगर पालिकेचे २० कर्मचारी १० पोलीस कर्मचारी सहभागी होते. याकरिता २ डंपर, २ जे सी बी, आणि २ ट्रॅक्टर वापरण्यात आले.

पोटाची खळगी भरण्यासाठी शिडीचा आधार

ऋतूप्रमाणे माल विक्रीसाठी घेऊन येत असतात. काहींची मुले इथे दहावीपर्यंत शिक्षण घेण्यासाठी तीन ते चार किलोमीटर पायपीट करून हे उभे डोंगर चढून वर येत असतात. वरोसा, उंबरवाडी, पिरकटवाडी या तीन वाड्यांचा खोंडा नावाने प्रसिद्ध असलेले आदिवासी गाव हे आपल्या उपजीविकेसाठी मोलमजुरी कामासाठी माथेरानलाच यावे लागते. उन्हाळा असो पावसाळा असो ही मंडळी आपला जीव मुठीत घेऊन आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी येत आहेत.

देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे लोटली असताना, आजही अनेक भागातील आदिवासी समाज मूलभूत सेवासुविधांपासून वंचित आहे. या डोंगर दऱ्यांमध्ये पिढ्यान्पिढ्या वास्तव्यात असणाऱ्या आदिवासींच्या मूलभूत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

पेणचा प्रभारी बीडीओ लाच घेताना अटकेत

गढरी यांची तक्रार लाच लुचपत प्रतिबंध कार्यालय अलिबाग रायगड येथे केली.त्या नुसार लाच लुचपत प्रतिबंध विभागाचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे, पोलीस हवालदार कौस्तुभ मगर, विवेक खंडागळे, स्वप्नाली पाटील यांच्यासह अन्य पथकाने आज दुपारी तीनच्या सुमारास पेण पंचायत समिती कार्यालय येथे सापळा रचून सदर अधिकारी एम.एन. गढरी यांना पंधरा हजार रुपयाची लाच स्वीकारताना गुरुवार दिनांक २३ रोजी रंगेहात पकडण्यात आले.

यावेळी सदर भ्रष्ट अधिकाऱ्याची कसून चौकशी सुरू आहे. दरम्यान भ्रष्ट प्रभारी गटविकास अधिकारी गढरी यांना रंगेहात पकडल्या मुळे पेण पंचायत समितीच्या ग्रामसेवकांसह इतर कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

रायगडच्या सुपुत्रांची स्वातंत्र्याची अमृत परिक्रमा

पर्व संपल्याचे जाहीर करण्यात आले. अमेरिकेतील ख्यातनाम डॉक्टर तसेच इंडुसेमचे संस्थापक डॉ. सागर गालवणकर यांच्या संकल्पनेतील

स्वातंत्र्याची अमृत परिक्रमा रायगड जिल्ह्यातील हे दोघे बाईकस्वार वास्तवात उतरवत आहेत.

परिक्रमेचे पहिले पर्व यशस्वी पूर्ण केले

स्वातंत्र्याची अमृत परिक्रमा ही एकूण ७५ दिवसांची देशव्यापी राइड असून परिक्रमेचा पहिला टप्पा नोव्हेंबर २०२१ मध्ये एकूण १२ राज्ये आणि ७००० किलोमीटरचा प्रवास करून पूर्ण केला गेला. या राइड दरम्यान भारतीय चलनावर छापलेल्या ऐतिहासिक स्थळांना त्यांनी भेट दिली. भारताचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभव जगापुढे आणण्याचा हा एक प्रयत्न होता. या विक्रमी बाईक राईडची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तसेच हावर्ड वर्ल्ड रेकॉर्ड लंडन या संस्थांद्वारे घेण्यात आली.

परिक्रमेचे पर्व दुसरे

परिक्रमेचा दुसरा टप्पा गाठत असताना भारतीय राष्ट्रगीताच्या सन्मानार्थ बाईक राइड केली गेली. पंजाब सिंध गुजरात मराठा द्राविड उत्कल बंग विंध्य हिमाचल यमुना गंगा या राष्ट्रगीतामध्ये नमूद केलेल्या प्रदेशांना तसेच नद्यांना या परिक्रमेत भेट दिली गेली. या परिक्रमेत एक भारत श्रेष्ठ भारत, अतुल्य भारत, देखो अपना देश या भारत सरकारच्या पर्यटन योजनांचा देखील यामध्ये प्रामुख्याने प्रचार आणि प्रसार केला जात आहे. भारत पर्यटन दिल्ली, पर्यटन मंत्रालय, भारत सरकार यांच्या योगदानातुन सुरू असलेली ही बाईक राइड भारतातील पर्यटन वाढीस हातभार लावण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरणार आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन कोलाबरेटिव्ह सेंटर फॉर इमेर्जेन्स अँड ट्रॉमा, एम्स दिल्ली, तसेच या जगविख्यात संस्थेचे या देशव्यापी बाइक राइड साठी पाठबळ मिळत आहे.

प्रसाद चौलकर यांनी या आधी नेपाळ, भूतान तसेच भारतातील २४ राज्यांमध्ये बाईक राइड केलेली आहे, त्यांच्या क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील विशेष कामगिरी बद्दल जिल्हा परिषद रायगड तर्फे रायगड मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. दुसरे बाईकस्वार अभिजित सिंग कोहली हे एक अनुभवी बाईक रायडर आणि युट्यूब ब्लॉगर असून त्यांना बाईकर ग्यानी म्हणून ओळखले. सोशल मीडियावर सुरक्षित प्रवास तसेच बाईक राइड साठी गरजेच्या साधनांविषयी माहिती देत असतात. बाईक राइड संबधी विविध विक्रम त्यांच्या नावावर आहेत. सदरची परिक्रमा ३ टप्प्यात होत असून या अमृत महोत्सवी वर्षात एकूण ७५ दिवस आणि २१००० किलोमीटरची बाईक राइड होणार आहे. परिक्रमेचे दोन टप्पे यशस्वीपणे पूर्ण केले असून नोव्हेंबर २०२१ मध्ये २३ दिवस, दुसऱ्या पर्वात ४२ दिवस राइड केली गेली. शेवटचा टप्पा हा १० दिवसाचा असणार आहे. परिक्रमेची समाप्ती १५ ऑगस्ट २०२२ रोजी नवी दिल्ली येथे होईल.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत या मिळकतीच्या विद्यमान मालक श्री.यशवंत नथु वारगे, रा.बेलोशी ता.अलिबाग, जि.रायगड, यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरीता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांना या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी सुरू केली आहेत.

मौजे	गट नं. /उपविभाग	क्षेत्र हे.आर.	आकार रू.पैसे
बेलोशी ता.अलिबाग जि.रायगड	३५९/१	०१-४५-५०	१.९५

सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असून या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे. तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा यांचेसोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहुन आलेली अशी कोणाचीही कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हे सर्वांस कळविले

अलिबाग
दिनांक :

स्वाक्षरीत/-
ॲड.सविता शं.पिंगळे
मु.पो.रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल श्री. विकास हरिश्चंद्र पाटील, रा. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड तसेच त्यांच्या इतर कुटुंबियांच्या सामायिक मालकीची मिळकत आहे.

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रु.पै.)
सारळ	९ (जुना स. नं. ३/१)	०-२३-५०	५.६८

सदरची मिळकत ही मिरकर कुटुंबियांचे मालकीची होती व आमचे अशिलांचे आजोबा श्री. राघो नथू पाटील हे ती मिळकत कुळ म्हणून कसत होते. त्यांचे पश्चात सदर मिळकत त्यांचे मुलगे द्रष्णा राघो पाटील, काशिनाथ राघो पाटील, हरिश्चंद्र राघो पाटील, गोपाळ राघो पाटील व रूक्मिणी रामचंद्र राणे यांचेकडे वारसा हक्काने आली. मात्र वडिल भाऊ म्हणून ती मिळकत द्रष्णा राघो पाटील यांचे नावे ७/१२ सदरी नोंदविण्यात आली होती. ते सन १९५९ साली मृत्यू पावल्यानंतर मिळकतीस त्यांचे वारसांची नोंद होऊन पांडूरंग द्रष्णा पाटील यांचे एकटयाचेच नाव मिळकतीचे ७/१२ सदरी नमूद करण्यात आले आहे. पांडूरंग द्रष्णा पाटील हे ता. २२/३/१९९७ रोजी मृत्यू पावल्यानंतर त्या मिळकतीस त्यांची पत्नी वनिता, मुली नलिनी, रसिका, स्वाती व मुलगा प्रसाद अशी नावे ७/१२ वर भोगवटादार सदरी नमूद करण्यात आली. त्यांचेपैकी वनिता ही मृत्यू पावली असून उर्वरित तीन मुलींनी रजिस्टर्ड हक्कसोडपत्राने त्यांचा हक्क सोडून दिल्यामुळे आजचेमितीस मिळकतीचे ७/१२ सदरी एकटया प्रसाद पांडूरंग पाटील याचेच नाव मालक व भोगवटादार म्हणून नमूद आहे.

मात्र असे असले तरी वर कथन केल्याप्रमाणे मिळकत आमचे अशिलांचे व प्रसाद पांडूरंग पाटील यांचे पुर्वगामी राघो नथु पाटील यांचे पासूनची कुळ कायद्याप्रमाणे संपादन केलेली मिळकत असल्यामुळे त्या मिळकतीमध्ये राघो नथु पाटील यांचे सर्व वारसांचा कायदेशीर हक्क आहे.

असे असताना श्री. प्रसाद पांडूरंग पाटील हे सदर मिळकत त्यांच्या एकटयाच्या मालकीची आहे असे भासवून, मिळकतीची खाजगी मोजणी करून त्यामध्ये भुखंड पाडून ते इच्छूक खरेदीदारांस विकण्याच्या तयारीत आहेत.

तरी सर्व संबंधितांस, इस्टेट एजंटांस व इच्छूक खरेदीदारांस याद्वारे असे कळविण्यात येत आहे की, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत श्री. प्रसाद पांडूरंग पाटील यांस मिळकतीचा खरेदी-विक्री अथवा अन्य व्यवहार परस्पर करण्याचा हक्क अधिकार नसल्याने त्यांचेबरोबर कुणीही वर वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. तसा कोणताही व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर होईल व तो आमचे अशिलांवर व इतर सहहिस्सेदारांवर बंधनकारक रहाणार नाही. ही नोटीस डावलून अथवा दुर्लक्षित करून कुणीही व्यवहार केल्यास त्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई सर्व संबंधितांवर करण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २४/६/२०२२

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग', को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

अर्जदारातर्फे ॲड.मोहनिश ठाकूर

जाहीर नोटीस

मुरूड येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.रायगड यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज नं.५३/२०२२

श्री.प्रमोद गणेश कासार — अर्जदार
विरूध्द
ग्रुप ग्रामपंचायत काशिद — सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार यांचे आजोबा कै.गोविंद गणपत कासार यांचे दिनांक १७/०५/१९७२ रोजी मौजे काशिद, ता.मुरूड, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झाले आहे. परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत काशिद, ता.मुरूड, जि.रायगड यांच्या कार्यालयीन दप्तरी सन १९७२ साली नोंदविण्याचे अनावधानाने व नजरचुकीने राहून गेलेले आहे. सदरच्या मृत्यूची नोंद होण्याकरीता आदेश मिळविण्याकरीता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.१८/०७/२०२२ रोजी पर्यंत मे.न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १६/०६/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपिक
प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी न्यायालय
मुरूड-रायगड

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी न्यायालय
मुरूड-रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमूद पत्त्यावर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे नांदगांव, ता.कर्जत,जि.रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नांव	सर्व्हे नं	हिस्सा नं	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
सत्यवान कान्हा नाईक अभिजित उत्तमराव जाधव स्नेहल अमितराज शेटे अमितराज दत्तात्रय शेटे धीरज विजय नलवडे मनिषा धीरज नलवडे	८७	८	०-६०-०	०-५९

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

सही/-
भुपेश तानाजी पेमारे
(ॲडव्होकेट)
दिनांक :२४/०६/२०२२
मो.नं.९१५८२७७७२८

शिहू बेणसेत वीज समस्येने जनता हैराण

आबालवृद्धांचे हाल, जनआंदोलन छेडण्याचा इशारा

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

शिहू बेणसे विभागाची वीजसमस्या मागील अनेक वर्षांपासून जैसे थे दिसून येते. उन्हाळा, पावसाळा व हिवाळा असो कोणत्याही ऋतूत विजबत्ती गुल होऊन विजेचा लपंडाव सुरूच असतो. वर्षानुवर्षे विजवितरण विभागाकडून जनतेला वेठीस धरले जातेय. रोज रात्री विजबत्ती गुल होत असल्याने शिहू बेणसे विभागातील जनता प्रचंड त्रासलीय. तर विजवितरण विभागाच्या विरोधात जनमानसातून असंतोषाची लाट उफाळून आलीय. शिव्यांची लाखोली देखील या दरम्यान वाहिली जातेय. आमच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, पळता भुई थोडी करू, विजवितरण विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विरोधात जनमानसातून संताप व्यक्त होत आहे. अजून मुसळधार पाऊस व अतिवृष्टी सुरू झालेली नाही तरी विज वीतरण विभाग पहिल्या सरीत नापास झाला ही अवस्था दिसून येते.

जागरूक नागरिक वीजवितरण सातत्याने वीज समस्येवर आवाज उठवितात. मात्र काही केल्या या परिस्थितीत कोणत्याही प्रकारची समाधानकारक सुधारणा होत नसल्याने महिला वर्गातून तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. दैनंदिन वीजपुरवठा खंडित राहून देखील येथील संबंधित अधिकारी व कर्मचारी नेमके करतात काय? असा संताप नागरिक व्यक्त करत आहेत.

शिहू बेणसे परिसरासह अन्य भागात विजेचा लपंडाव काही केल्या थांबेना. रात्री मच्छर रक्त पित आहेत. याबरोबरच उन्हाळ्यात उष्म्याने अंगाची लाहीलाही होत आहे. त्यामुळे येथील नागरिक पुरते त्रस्त झाले आहेत. विजेचा लपंडाव थांबवा, वीजपुरवठा सुरळीत करा, सहनशीलतेचा अंत पाहू नका, अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा संताप महिला वर्ग व तरुणवर्गाने दिला आहे. पावसाळ्यात वीज पुरवठा खंडीत होणे नित्याचेच झाले आहे. विजेच्या लपंडावाने नागरिक, बालबच्चे वृद्ध सारेच बेजार झाले आहेत. लहान मुले रात्रभर रडत आहेत, रुग्ण देखील त्रासले आहेत. खंडित झालेला वीजपुरवठा केव्हा पूर्ववत होईल याचा अंदाज येत नसल्याने नागरिक सतत चिंतेत असतात. विजवितरण अधिकारी व कर्मचारी मात्र मंद गतीने पाऊले टाकताना दिसत आहेत. विजबत्ती गुल झाल्यावर कर्मचारी नॉटरीचेबल होतायत. विजवितरण कर्मचाऱ्यांची कार्य तत्परता दिसून येत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

शिहू बेणसे विभागातील जनतेला वर्षातील बाराही महिने विजसमस्येला सामोरे जावे लागत आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत विज वितरण मर्यादित कंपनी अंतर्गत शिहू बेणसे विभागात अनेक गावे व आदिवासींवाड्यापाड्यांना विद्युत पुरवठा केला जातो. मात्र आजमितीस सातत्याने विजेचा लपंडाव सुरूच असून विद्युत देयके मात्र आवाक्याच्या बाहेर येत असल्याने सर्वसामान्य गोरगरीब जनतेतून संताप व्यक्त केला जात आहे.

या विभागात आदिवासीवाड्यापाड्यांचा समावेष असून याठिकाणी मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती विस्तारलेली आहे. सर्प, विंचू व किटकांची भिती असल्याने अंधारात घराबाहेर बाहेर पडणे नागरिकांना धोक्याचे झाले आहे. तसेच डास व मच्छरांच्या उपद्रवाने नागरिकांचे आरोग्य देखील धोक्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तर व्यवसाईक व व्यापारी वर्गाचे देखील नुकसान होत आहे. विजपुरवठा सुरळीत असो अथवा नसो विजबिल मात्र न चुकता येत असून ते वेळेत भरण्याची सक्ती केली जाते. विजबिल भरण्यास विलंब झाल्यास विजपुरवठा खंडीत करण्याच्या वेगवान प्रक्रियेला येथील नागरीकांना सातत्याने सामोरे जावे लागते. दरम्यान विजवितरण अधिकारी व कर्मचारी यांनी या विभागाची विजसमस्या कायम संपविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करावी व जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

महत्त्वाचे

आयटीआयमध्ये वृक्षदिंडी

तळा : तळा शहरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था कॉलेजमध्ये वृक्षदिंडी व वृक्षलागवड कार्यक्रम बुधवार दि.२२ रोजी संपन्न झाला. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबविण्यासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून तळा शहरातील आयटीआय कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांकडून घोषवाक्य म्हणत वृक्षदिंडी काढण्यात आली. व या वृक्षदिंडीच्या माध्यमातून पर्यावरण पुरक असलेली १२५ रोपे लावण्यात आली. या वृक्षदिंडी व वृक्षलागवड कार्यक्रमात प्राचार्य चव्हाण पी.पी.,संस्थेचे निर्देशक एम.व्ही.भूतकर, शिक्षक वर्ग तसेच विद्यार्थी,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हिरवे गुरुजींची जयंती साजरी

नवीन पनवेल : गोवा मुक्ती संग्रामात वयाच्या अवघ्या ३७ व्या वर्षी शहीद झालेले पनवेलचे स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा हिरवे गुरुजींची १०४ वी जयंती होती. हिरवे गुरुजींच्या मोठ्या सुनबाई अरुणा हिरवे यांनी शालेय जीवनावरील एक सुंदर अशी कविता गाऊन उपस्थित शालेय विद्यार्थ्यांसह सर्वांना मंत्रमुग्ध केले. पुढे गुरुजींचे नातू नागेश हिरवे यांनी गुरुजींच्या जन्मापासून शहीद होण्यापर्यंतचा इतिहास थोडक्यात मांडला. त्यानंतर शाळेतील विविध वर्गातील प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले आणि शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

बोर्ली खाडीपात्रातील अवैध भराव

ग्रामस्थ आक्रमक, पुराची शक्यता

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील बोर्ली साई मंदिर येथे कोलमांडला येथील सुरू असलेल्या बोर्ली खाडीपात्रातील अवैध भराव चालू असल्याचे बोलले जात आहे. त्याबरोबर कांदळवन तोडीमुळे पावसाळ्यात येणारी संकटे भरतीचे पाणी गावात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबाबत ताराबंदर कोळीसमाज, बोर्लीतील कोळी समाज, पंचकूमसमाज, मुस्लिम समाज, बौद्धसमाज यांची संयुक्त सभा मान्यवरांच्या उपस्थितीत साई मंदिरात घेण्यात आली.

या सभेत कोलमांडला येथील गट क्र. ५४ मध्ये होत असलेल्या अवैध कामा विरोधात चर्चा करण्यात येऊन निषेधाचा ठराव घेण्यात आला. बोर्ली खाडीपात्रातील कांदळवन (मँग्रोज) तोड आणि भराव यामुळे पावसाळ्यात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊन वेळप्रसंगी काही नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्यास, त्यास गट क्र, ५४ मध्ये भरावाचे काम करणारे गट क्र. ४९ चे मालक हेच सर्वस्वी जबाबदार असतील असा ठराव घेण्यात आला. तसेच यापुढील पत्रव्यवहार हा सर्व समाज अध्यक्ष यांनी या प्रकणाशी निगडित सर्व सरकारी कार्यालयांशी करावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सभेस बोर्ली, ताराबंदर येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

कोकण किनारपट्टीवरील अलिबाग व मुरूड तालुक्यात समुद्राला येऊन मिळणाऱ्या खाड्या बुजविण्याचे काम राजरोसपणे सुरू असूनही प्रशासनाकडून होणाऱ्या दुर्लक्षामुळे जनतेमध्ये प्रचंड नाराजीची भावना निर्माण झाली आहे. मागील पावसाळ्यात पाचशे मि.मी. पेक्षा जास्त पाऊस झाला होता. पिठोरी अमावस्येला मोठ्या प्रमाणात पडलेला पावसामुळे गावात पाणी शिरुन नुकसानीला सामोरे जावे लागले होते. मुरुड तालुक्यातील बोर्ली खाडीपात्रातील अवैध भराव, मँग्रोज तोडीमुळे पावसाळ्यात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाल्यास उद्भवणारा संभाव्य धोका लक्षात घेऊन तातडीने घेण्यात आलेल्या सर्व समाज बांधवांच्या सभेत पावसाळ्यात वेळप्रसंगी आपत्ती निर्माण झाल्यास संबंधित मालक व प्रशासन जबाबदार राहतील असा निर्णय घेण्यात आला.

पावसाळी मासेमारीबंदी केवळ कागदावरच

। उरण । वार्ताहर ।

उरणमध्ये पावसाळी मासेमारी बंदीची वाताहत झाली असल्याचे समोर आले आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात बंदी झुगारून मासेमारीसाठी खोल समुद्रात गेलेल्या मासेमारी नौका मासेमारी करून परत येऊ लागल्या असून त्यातील मासळीचा खुलेआम बाजार करंजा येथील एका बंदराच्या समोर असणाऱ्या मोकाट रस्त्यावर रात्रीच्या अंधारात भरवला जात असल्याची माहिती हाती आली आहे.

पावसाळी मासेमारी बंदीची कडक अंमलबजावणी करावी असे महाराष्ट्र राज्य मत्स्यव्यवसाय विभागाचे आदेश आहेत मात्र शासनाच्या या आदेशांची कडक अंमलबजावणी करावी तर त्यासाठी तालुका मत्स्यव्यवसाय विभागाला हवी असणारी गस्ती नौकाच नेमकी या पावसाळी मासेमारी बंदीच्या काळात बंद केली असल्याने स्थानिक अधिकारी वर्गाने रात्रीच्या अंधारात मासेमारी साठी जाऊन आलेल्या नौकांवर कारवाई तरी कशी करायची असा गहन सवाल मत्स्यव्यवसाय खात्याच्या तालुक्यातील अधिकारी वर्गापुढे पडला आहे. त्याहून आश्चर्याची बाब म्हणजे उरण, पनवेल आणि पेणचा अर्धा तालुका अशा अडीच तालुक्यांच्या मत्स्य व्यवसाय विभागाचा कामाचा भार हा एक अधिकारी आणि ठराविक ठिकाणी तैनात असलेले खाजगी सुरक्षा रक्षक यांच्यावर असल्याने काम करण्याची तळमळ असलेल्या अधिकारी वर्गाला देखील ओसाड गावचा पाटील असल्याचा अनुभव नियमित येत आहे. गस्ती नौका आणि कर्मचारी वर्गाची सातत्याने मागणी करूनही त्यातून काहीच निघत नसल्याने वरिष्ठांचाच तर बंदीच्या काळात होत असलेल्या चोराटी मासेमारीला आतून पाठिंबा नाही ना असा सवाल या ठिकाणी विचारला जात आहे. उरण तालुक्यात करंजा, मोरा या मुख्य बंदर विभागासह तालुक्यातील दिघोडे, कोप्रोली, आवरे आदी गावोगावच्या शेकडो मासेमारांच्या हजारो मासेमारी नौका आहेत. तालुक्यात मासेमार विकास संस्था देखील अगदी एकास एक चिकटून असल्यासारख्या भाराभर आहेत. यातील तीन किमीच्या परिघात एकच मच्छीमार संस्था असावी या शासनाच्या नियमालाही या ठिकाणी हरताळ फासलेला आहे.

पीडब्ल्यूडीच्या जागांवर अतिक्रमणे

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यालगत शेकडो अतिक्रमण झालेले दिसत आहेत. मात्र त्यांच्यावर गेली कित्येक वर्षापासून कारवाई करण्यात आलेली नसल्याने सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कारभाराबाबत साशंकता निर्माण झाली आहे. सुकापुरपासून पुढे रस्त्यालगत हजारो अतिक्रमणे असताना देखील सार्वजनिक बांधकाम विभागाने केवल १३२ जणाना नोटीसा पाठवल्या आहेत.

पनवेल परिसर झपाट्याने बदलत चालला आहे. सुकापूर, आकुर्ली, चिपळे, नेरे आदी परिसरात मोठ्या

प्रमाणात लोकवस्ती देखील वाढत चालली आहे. त्याचा परिणाम येथील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यालगत अनेक हातगाड्या, लाद्यांच्या दुकानापासून बेड, सोफा, बेकायदेशीर घरे, पक्की बांधकामे, गाड्या धुण्याचे सेंटर, मटन, चिकन दुकाने, पाणीपुरी स्टोल उभारले गेले आहेत. मात्र सार्वजनिक बांधकाम खात्याचे या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. या रस्त्याला माथेरान रस्ता असे संबोधले जाते. सुकापूर गावापासूनचा परिसर नैनामध्ये येत असून आकुर्ली, चिपळे, कोप्रोली आदी परिसरात सार्वजनिक बांधकाम खात्याच्या जागेवर अतिक्रमणे उभी राहिली आहेत. यातील बहुतांशी परप्रांतीय आहेत. त्यांच्याकडून काही नागरिक भाडे वसूल करत असल्याचे समोर आले आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे माथेरान रस्त्यावरील जागा १९६५ ते १९७० च्या दरम्यान हस्तांतर केली असल्याची माहिती देण्यात आली आहे.

मात्र अनेक ठिकाणी अतिक्रमणे झालेली दिसत आहे. यावर कारवाई करण्यात येत नाही. आजतोगायत सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत कारवाई करण्यात आलेली नसल्याने अतिक्रमणांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

पावसामुळे भाताच्या रोपांना दिलासा

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी परिसरातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील भातपेरणीला सुरुवात केली आहे. चावणे, आपटे, मोहोपाडा, वडगाव पंचक्रोशीत शेतकरी भाताचे पीक घेत असून पाऊस पडताच बियाण्यांची पेरणी केली. पाऊस पडला नाही तर पेरणी केलेली बियाणे पाखरे वेचून खातील, अशी भीती शेतकऱ्यांना होती. मात्र पावसाच्या सरी कोसळू लागल्याने भातरोपे वाढू लागली आहेत. लावणीसाठी रोप तयार होईर्पयंत दहा बारा दिवसांत दमदार पाऊस पडणे आवश्यक असल्याचे पोसरी येथील नंदकुमार पाटील यांनी सांगितले.

बोगस न्यूज पोर्टल चालविणाऱ्यांवर कारवाई

। पेण । वार्ताहर ।

जिल्ह्यातील बोगस न्यूज पोर्टलचा पत्रकारांकडून जनतेला होणाऱ्या त्रासाबद्दल मार्चमध्ये झालेल्या आर्थिकअधिवेशनात या औचित्य मुद्दयावरून मुद्द अपस्थित केला होता. यावर लवकरच रायगड पोलिसांद्वारे कारवाई होणार असल्याने अशा पत्रकारांचे धाबे दणाणले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, जिल्हयात अनेक ठिकाणी काही उत्साही व अतिउत्साही संपादकांनी स्वत:चे न्यूज पोर्टल सुरू केलेले आहे. यात काही संपादकांनी नवीन न्यूज चॅनेल तयार करून आरएनआयचा उल्लेख केलेला आहे. रजिस्ट्रेशन न्यूज पेपर ऑफ इंडिया ही सरकारी यंत्रणा फक्त वृत्तपत्राशी संबंधित असून न्यूज पोर्टल डिजीटल मिडीयाशी काही एक संबंध नसल्याने कायदेशीररित्या अधिकृत नसून बोगस असल्याचे निदर्शनास आले आहेत.

अशा बोगस पत्रकारांकडून सर्वसामान्य जनतेचे ब्लॅकमेकिंग, लुटमारीचे प्रकार व फसवणुक होत असल्याच्या वारंवार तक्रारी येत असल्याने अशा बोगस पत्रकारांविरूध्द कायदेशीर कारवाई करावी, अशा सूचना रायगडातील सर्वपोलीसठाण्यातील अधिकाऱ्यांना गृहविभाग प्रशासनाकडून आल्या आहेत. याबाबतचे परिपत्रक दयानंद गावडे यांनी पाठविले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अतिउत्साही बोगस न्यूज पोर्टल व पत्रकारांचे धाबे दणाणले आहेत.

कोकणातील सात सरपंच बडतर्फ

१ उपसरपंच, १ सदस्यावर अपात्र कारवाई

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

कोकण विभागातील एकूण ७ सरपंच, १ उपसरपंच व १ सदस्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम ३९ नुसार अधिकार व सदस्य पदावरून काढून टाकण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी केली आहे. कोंकण विभागांतर्गत ग्रामपंचायतींवर झालेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी दुसरी कार्यवाही आहे.

कोकण विभागांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांमधील ग्रामपंचायतींमध्ये सरपंच, उपसरपंच, सदस्यांमार्फत होणारे गैरवर्तन, गैरव्यवहारांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदेने सादर केलेल्या अहवालानुसार ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर व सिंधुदूर्ग या जिल्हयांमधील एकूण ३५ सरपंच, उपसरपंच व सदस्यांवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील तरतूदीनूसार आयुक्त विलास पाटील यांनी सुनावण्या घेतल्या होत्या. यापैकी १६ प्रकरणांवर निर्णय घेण्यात आले होते. उर्वरित १० प्रकरणांचा फेरअहवाल सादर झाल्यानंतर या १० प्रकरणांमध्ये सिंधुदुर्ग जिल्हयातील ग्रा.पं. पेंडूर-वेंगुर्ला, रायगड जिल्हयातील ग्रा. पं. रासळ-सुधागड पाली, ग्रा.पं. वावंढळ खालापूर, ग्रा.पं. तळवली तर्फे अष्टमी-रोहा येथील सरपंच यांना त्यांच्या सरपंच तसेच सदस्य पदावरुनही दूर करण्यात आले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील ग्रा.पं. उसप- दोडामार्ग, ग्रा.पं. कळसुली-कणकवली व ठाणे जिल्ह्यातील ग्रा. पं.नांदप-कल्याण येथील सरपंचांना त्यांचे सरपंच पदावरुन दुर करण्यात आलेले असून त्यांचे सदस्यत्वपद कायम ठेवणेत आले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील ग्रा.पं. कडावल-कुडाळ येथील उपसरपंच यांना त्यांच्या पदावरुन दुर करुन त्यांचे सदस्य पद कायम ठेवलेले आहे.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची

खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

PNP
आजच प्रवेश निश्चित करा
अलिबागमधील कौशल्य विकासावर भर देणारे एकमेव
कनिष्ठ महाविद्यालय

- अत्याधुनिक पायाभूत सुविधा
- कला व वाणिज्य शाखेच्या इंग्रजी आणि मराठी माध्यमाचे स्वतंत्र बॅचेस
- अनुभवी अध्यापक वर्ग
- सुसज्ज प्रयोगशाळा
- भव्य खेळाचे मैदान

XI, XII + कौशल्य विकास प्रशिक्षण

Veshvi - Gondhalpada Alibag, Maharashtra, India 402 209
MORE INFORMATION +91 8482867876
pnpacsjrcollege@gmail.com

संपादकीय

कारस्थान आणि कीव

अडीच वर्षांपूर्वी अजित पवार काही काळासाठी परांगदा झाले. फडणवीसांसोबत त्यांनी पहाटेचे सरकार बनवलं. पण नंतर शरद पवारांनी सूत्रं हाती घेऊन त्यांना एकटे पाडले. त्यांच्यासोबत राष्ट्रवादीचा कोणीही आमदार जाणार नाही अशी व्यवस्था केली. याउलट, एकनाथ शिंदे यांच्या बंडाला ४८ तास उलटून गेल्यावर सेनेचा प्रतिसाद बावचळलेला किंवा थंड आहे. त्यामुळे हे बंड उद्धव ठाकरे यांच्या इच्छेनेच घडून आले की काय अशी शंका समाजमाध्यमांवर व्यक्त केली गेली. राजकारण्यांच्या कोणत्याच वागण्या-बोलण्यावर लोकांचा कसा विश्वास उरलेला नाही याचे हे निदर्शक आहे. आता सेनेच्या गुवाहाटीत गेलेल्या आमदारांनी परत येऊन ठाकरे यांच्यासमोर आपली भूमिका मांडल्यास सेना महाविकास आघाडीतून बाहेर पडेल असे संजय राऊत यांनी जाहीर केले आहे. म्हणजे शिंदे यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्यात गैर काहीच नाही असे सेना नेतृत्वाला वाटत आहे असा निष्कर्ष त्यातून निघतो. तशीच वेळ आली तर बंडखोरांसमोर झुकायला ठाकरे तयार आहेत असाही याचा अर्थ होतो. एकाच वेळी बंड केलेले आमदार म्हणजे खरी शिवसेना नव्हे असे म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांनी परत यावे असे आवाहन करायचे हा सेना नेतृत्वाच्या डावपेचांचा भाग असेल. पण त्यातून जाणारा संदेश हाच आहे की ठाकरे यांनादेखील न जुमानणारा एक मोठा गट आता पक्षात तयार झाला आहे. ठाकरे यांनी काल वर्षा हे सरकारी निवासस्थान सोडताना रस्त्यावरचे शिवसैनिक आपल्या बाजूला आहेत असे दाखवायचा प्रयत्न केला. पण विधिमंडळातली लढाई ही आकड्यांची असेल. तिथे या शक्तिप्रदर्शनाचा शून्य उपयोग असेल. हे बंड कोणत्या दिशेने जाईल हे येत्या दोन-तीन दिवसात स्पष्ट होईल. काल शरद पवार आणि आज जयंत पाटील यांनी विरोधी पक्षात बसण्याला आपण तयार आहोत असे सांगून काय होईल याचे संकेत दिले आहेतच. महाराष्ट्रातील सत्ता गेल्यापासून भाजपचे नेते वेडेपिसे झाले आहेत. आजवर आघाडी सरकार पाडण्याचे बरेच प्रयत्न त्यांनी केले. पण ते यशस्वी झाले नाहीत. यावेळचा डाव मात्र तडीला नेतील असे दिसते. एकनाथ शिंदे यांचे बंड हे भाजपचे कारस्थान आहे असे राऊत म्हणतात. ते पूर्ण खरे आहे. यातील अनेक आमदारांना इडी किंवा अन्य संस्थांच्या कारवायांची भीती घालून भाजपने शिंदे यांच्यासोबत जायला भाग पाडले आहे यात शंका नाही. शिवाय जिथे शिवसेनेचे कार्यकर्ते आणि महाराष्ट्राचे पोलिस सहजासहजी पोचू शकणार नाहीत अशा सुदूर आसामध्ये या सर्वांना नेऊन ठेवणे हेदेखील भाजपच्या अमित शहांसारख्यांचे डोके असले पाहिजे. अलिकडेच गुजरातेतील दलित आमदार जिग्नेश मेवानी यांना नरेंद्र मोदींविरुध्द ट्विट केले म्हणून आसामचे पोलीस उचलून घेऊन गेले होते. नंतर गुवाहाटी न्यायालयाने अतिशय कडक ताशेरे मारून हे प्रकरण रद्द केले. त्यामुळे सध्या इतरत्र उत्पात करण्यासाठी आसाम ही भाजपसाठी भरवशाची भूमी दिसते. त्यातही कालपर्यंत ज्यांना तुरुंगात टाकण्यासाठी धडपड केली त्या प्रताप सरनाईक किंवा यामिनी जाधव यांच्यासारख्यांना पावन करून घेताना कोणतीही लाज-शरम वाटू नये हे तर या नव्या भाजपचे वैशिष्ट्यच आहे. कोणत्याही किमतीवर सत्ता मिळवणे हेच भाजपचे ध्येय झाले आहे. देवेंद्र फडणवीस सध्या पडद्याआडून सूत्रे हलवत आहेत आणि बंडखोरांना कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे नाचायला लावले जात आहे. खुद्द शिंदे यांनी २०१९ मध्ये भाजपसोबत संबंध तोडा असे आवाहन करून उद्धव यांच्याकडे मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. ते आता देवेंद्रांच्या नेतृत्वातील सरकारच हवे असे म्हणत आहेत. गेल्या दोन वर्षात शिवसेनेची गळचेपी झाली असे त्यांचे ट्विट किंवा उद्धव यांचे वर्षाचे दरवाजे आम्हाला कधीच खुले नव्हते असे संजय शिरसाट यांनी लिहिलेले पत्र आणि थेट सेनेच्या धनुष्यबाण या चिन्हावर दावा करणे या सर्व भाजपने करवून घेतलेल्या गोष्टी आहेत. पण या सर्व भाजपने करवून घेतलेल्या गोष्टी आहेत. पण या सर्व कारस्थानाला तोंड देण्यात सेना पुरी पडली नाही ही वस्तुस्थिती आहे. आणि, राजकारणात अशा दुर्बलांची केवळ कीवच केली जाते.

अर्थव्यवस्थेच्या विकासातले स्पीडब्रेकर!

कैलास ठोळे

कोरोनाच्या विळख्यातून जग सावरत असताना कोरोनाची चौथी लाट येण्याची भीती व्यक्त होत आहे. दुसरीकडे रशियाने युक्रेनविरोधातलं युद्ध आणखी तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. तिसरीकडे महागाईतली वाढ, अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने घेतलेला व्याजदरात वाढ करण्याचा निर्णय, डॉलरच्या दरात झालेली वाढ आणि एकूणच आयातीवर होणारा जादा खर्च यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासावर परिणाम झाला आहे.

वेगाने विकसित होणाऱ्या जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग अधिक आहे. देशातला कोरोना महामारीचा प्रभाव कमी झाला आहे, परंतु अर्थव्यवस्थेने अजूनही हवा तसा जोर धरलेला नाही. देशाच्या अर्थव्यवस्थेचं ताजं चित्र मांडणाऱ्या एका आकडेवारीनुसार २०२१-२२ या आर्थिक वर्षात देशाचा जीडीपी ८.७ टक्के दराने वाढला आहे. ही आकडेवारी समाधानकारक नसल्याचं अर्थतज्ज्ञ सांगतात. याआधी केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी जीडीपी ९.२ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला होता. मोदी सरकार सत्तेत येऊन आठ वर्षं पूर्ण झाल्याचा आनंद साजरा करत आहे; पण आर्थिक विकासाचा वेग वाढवण्यात अजूनही अपयश येत असल्याचं या आकडेवारीवरून दिसून येतं. या अपयशाचं मूल्यमापन करताना सरकारकडे देण्याजोगी दोन मोठी कारणं आहेत. पहिलं म्हणजे कोरोना तर दुसरं रशिया-युक्रेनमध्ये सुरू असणारं युद्ध. जानेवारी ते मार्चदरम्यान कोरोना ओमिक्रॉनने दार ठोठावल्यामुळे आणि रशिया आणि युक्रेनदरम्यानच्या युद्धामुळे वस्तूंच्या किमतीत वाढ झाली. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात मंदी आल्याचं मानलं जातं. सहाजिकच या तिमाहीत देशाच्या जीडीपीवाढीचा दर कमी झाल्याचं दिसून आलं आहे. अधिक चिंतेची बाब म्हणजे आर्थिक विकासाची गाडी मंदावली असताना दुसरीकडे महागाई सातत्यानं वाढत आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या मते, २०२२-२३ मध्ये महागाई दर ५.७ टक्के राहण्याचा अंदाज आहे. याआधी ब्रोकरेज हाऊस मॉर्गन स्टॅनलीनेही वाढती महागाई, ग्राहकांची कमकुवत झालेली मागणी आणि तंग आर्थिक परिस्थिती यामुळे व्यावसायिकतेवर विपरित परिणाम होईल, असं म्हटलं होतं. वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे महागाई आणखी वाढेल. चालू खात्यातील तूटदेखील दहा वर्षांच्या उच्चांकी ३.३ टक्क्यांपर्यंत वाढू शकते. गेल्या एप्रिलमध्ये किरकोळ महागाईचा दर आठ वर्षांच्या उच्चांकावर म्हणजेच ७.७९ टक्क्यांवर पोहोचला आहे तर घाऊक महागाईचा दर नऊ वर्षांच्या उच्चांकावर म्हणजेच १५.०८ टक्क्यांवर पोहोचला आहे. महागाई नियंत्रणात आणण्यासाठी रिझर्व्ह बँकेनं रेपो दरात वाढ केली. परंतु जर महागाई वाढली तर कर्ज अधिक महाग होऊ शकतं. त्याचा परिणाम मागणीवर होईल. अशा परिस्थितीत व्याजदर वाढल्यानं फक्त गुंतवणूक, रोजगार आणि उत्पन्न कमी होईल असं नाही. इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सचे प्रोफेसर डॉ. अरुण कुमार म्हणतात की, पुरवठ्यातील अडचणी दूर करणं, सट्टेबाजीला आळा घालणं आणि महागाई कमी करण्यासाठी अप्रत्यक्ष कर कमी करणं हे सरकारचं काम आहे. अर्थव्यवस्थेचं पुनरुज्जीवन करण्यासाठी सरकारला मदत करण्याची गरज आहे. यासाठी थेट अर्थसंकल्पातील वित्तीय तूट न वाढवता अप्रत्यक्ष करात कपात करता यावी यासाठी कर संकलन वाढवावं लागेल. यासाठी अनेकवेळा विशेष पावलं उचलण्यात आली आहेत. त्यांच्या मते, अर्थसंकल्पाची पुनर्रचना करण्याची गरज आहे. अर्थव्यवस्थेतील मंदीमुळे महसुलात घट होईल. सारांश, सध्या अर्थव्यवस्थेला मंदीचा सामना करावा लागत आहे. त्याला सामोरे जाण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून तसंच सरकारकडून पावलं उचलण्याची गरज आहे.

भारत अधिकृतपणे जगातील सर्वात वेगानं वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनला आहे. आकडेवारीनुसार, २०२१-२२ या आर्थिक वर्षात जीडीपी वाढीचा दर ८.७ टक्के नोंदवला गेला. हा आकडा गेल्या वर्षी ६.६ टक्क्यांच्या नकारात्मक विकास दरानंतर आला आहे. कोरोनाच्या आधीच्या वर्षाच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार आता मोठा झाला आहे. उच्च जीडीपी वाढीचा दर नोंदवताना भारतीय अर्थव्यवस्था मुख्यत्वे खासगी घरगुती वापरावर अवलंबून आहे आणि सामान्य भारतीय कुटुंबांकडून असे स्पष्ट संकेत आहेत की, ते अजूनही दुचाकी आणि स्मार्टफोनवर पैसे खर्च करण्यास नाखूश आहेत. आर्थिक वर्षात दुचाकींच्या विक्रीत सुमारे ११ टक्क्यांची घट झाली आहे. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे मार्च २०२२ च्या तुलनेत एप्रिल २०२२ मध्ये दुचाकींच्या विक्रीत सुमारे ३.६ टक्क्यांनी घट झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या ग्राहक आत्म विश्वास सर्वेक्षण आणि सी व्होटर सर्वेक्षणानुसार, मार्च २०२२ पासून ग्राहक खरेदीस अनुत्सुक आहेत. मे २०२२ च्या सर्वेक्षणात तीनपैकी दोन लोकांचं म्हणणं आहे की, त्यांना कौटुंबिक खर्च भागवण्यात खूप अडचणी येतात. ग्राहकांच्या या भावना सुधारत नाहीत, तोपर्यंत जीडीपी (एकूण देशांतर्गत उत्पादन) वाढीचा दर शाश्वत नाही.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे सांख्यिकी कार्यालयानं जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, २०२१-२२ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा जीडीपी ८.७ टक्के दरानं वाढला आहे. मंत्रालयाच्या या आकडेवारीनंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला असेल परंतु हा आकडा गेल्या वर्षीच्या ९.५ टक्के विकास दराच्या अत्याधिक अंदाजापेक्षा कमी आहे. अर्थात असं असलं तरी या अंदाजे आकडेवारीची थट्टा करता येणार नाही. कारण आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत ओमिक्रॉन लाटेमुळे काही अडथळे आले होते आणि ही आकडेवारी लक्ष्यापर्यंत पोहोचली नाही. तरी ६.६ टक्क्यांच्या घसरणीनंतर २०२०-२१ मध्ये ८.७ टक्के वाढीचा अर्थ असा होतो की, अर्थव्यवस्थेचा आकार आता कोरोनापूर्वीच्या पातळीपेक्षा खूप मोठा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या समर्थकांना अर्थव्यवस्थेचं हे चित्र कधीच मान्य होणार नाही; परंतु त्यांच्याच सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयानं दिलेल्या आकड्यांकडे गांभीर्यानं पाहिलं तर परिस्थिती दिसते तितकी गुलाबी नाही. हे चित्र निराशाजनक नक्कीच नाही पण खूप समाधानकारक आहे असंही नाही.

भारताची अर्थव्यवस्था चीनसारखी गुंतवणूकप्रधान नाही. भारतीय अर्थव्यवस्था खासगी उपभोगावर अवलंबून आहे. एकूण जीडीपीमध्ये गुंतवणुकीचा वाटा सुमारे ३२ टक्के आणि दैनंदिन सरकारी खर्चांच्या सुमारे ११ टक्के आहे. जीडीपीचे आकडे पाहण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे कृषी, औद्योगिक आणि सेवा क्षेत्रांचा डेटा पाहणं. देशाची अर्थव्यवस्था वेगात वाढते आणि जीडीपी वाढीचा दर तेव्हाच वाढतो जेव्हा उपभोग आणि गुंतवणूक या दोन्हींवर पैसा खर्च होतो. उच्च जीडीपी वाढ कायम ठेवायची असेल तर खासगी वापर महत्त्वाचा आहे; पण संकेत फारसे उत्साहवर्धक नाहीत. २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत (जानेवारी ते मार्च) जीडीपी वाढीचा दर फक्त ४.१ टक्के होता. हेदेखील कारण होते की, ते प्रामुख्याने कृषी आणि सरकारी खर्चावर चालत होते. कारण या तिमाहीत खासगी वापरामध्ये अल्प १.८ टक्क्यांनी वाढ झाली होती. खासगी खप झपाट्यानं वाढण्याची चिन्हं नाहीत. असे डझनभर निर्देशक आहेत जे भारतीय ग्राहक किती खर्च करत आहेत आणि याचा उच्च विकास दर कसा होतो हे दर्शवतात.

चालू आर्थिक वर्षात परिस्थिती फारशी चांगली नाही. ताज्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणानुसार ५० टक्के भारतीय कुटुंबांकडे दुचाकी आहे. त्यामुळे दुचाकी विक्री हे खासगी वापराच्या प्रवृत्तीचं विश्वसनीय सूचक मानलं जाऊ शकतं. जीडीपी ८.७ टक्क्यांनी वाढत असतानाही दुचाकी वाहनांच्या विक्रीत ११ टक्क्यांनी घट झाली आहे. चालू आर्थिक वर्षात परिस्थिती फारशी चांगली नाही. एप्रिल २०२१ च्या तुलनेत दुचाकींच्या विक्रीत १५.३ टक्के इतकी चांगली वाढ झाली आहे. हे आशादायक वाटतं परंतु मार्च २०२२ च्या तुलनेत एप्रिलमध्ये विक्री ३.४६ टक्क्यांनी कमी झाली. याचा अर्थ मध्यमवर्गीय भारतीय अजूनही खरेदीवर पैसे खर्च करण्याच्या मनस्थितीत नाहीत.

स्मार्टफोन ग्राहकांच्या खर्चाचा कलदेखील दर्शवतो. मार्केट रिसर्च फर्म कॅनालिसच्या मते, आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या शेवटच्या तिमाहीत स्मार्टफ्रोनची विक्री केवळ दोन टक्क्यांनी वाढली आहे. सामान्य लोक पैसे केव्हा आणि कसे खर्च करतात हे समजण्यासाठी अर्थशास्त्रज्ञ असण्याची गरज नाही. फक्त आवश्यक गोष्टींवर पैसे खर्च करा आणि इतर खरेदी पुढं ढकलण्याची मानसिकता सध्या भारतीय ग्राहकांची आहे. संकटाचा सामना करण्याच्या तयारीत तो व्यस्त आहे. मार्च २०२० पासून ग्राहकांचा क्रयशक्ती कमकुवत राहिली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेनं जाहीर केलेल्या द्वि-मासिक ग्राहक आत्मविश्वास अहवालातही याची पुष्टी झाली आहे. मार्च २०२० पासून सुरू असलेल्या ट्रॅकर सर्वेक्षणाचा भाग म्हणून सी व्होटरनं मे २०२२ मध्ये देशव्यापी सर्वेक्षण केलं. या सर्वेक्षणात देशभरातील तीनपैकी किमान एकानं कुटुंबाचं उत्पन्न कमी झालं आहे किंवा खर्च वाढला आहे, असं आढळलं आहे. सी व्होटर सर्वेक्षणात, भारतातील प्रत्येक तीनपैकी दोन उत्तरदात्यांचा दावा आहे की त्यांना महागाईमुळे घरखर्चाचं व्यवस्थापन करणं खूप कठीण जात आहे. ही निश्चितच धोक्याची घंटा आहे.

शिवसेना

व्हायरल

मी १९६६ साली पदवीधर झालो. त्याच सुमारास शिवसेना स्थापन झाली. मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारी संघटना असे तिचे मूळ स्वरूप होते. मला आणि मलाच काय त्याकाळातील अनेक तरुणांना शिवसेनेचे आकर्षण होते, आपुलकी होती, जिव्हाळा होता. माझे अनेक नातेवाईक शिवसेनेचे काम करीत.

शिवसेनेच्या एका दसरा मेळाव्याला- शिवाजीपार्क येथे मी हजर होतो. शिवसेनेची सभा झाली की उडुपी हॉटेल्स वर दगडफेक होत असे. Fringe Elements असे म्हणून आम्ही तिकडे काणाडोळा करत असू.

शिवसेना हे नाव प्रबोधनकारानी सुचविले होते असे कुठेतरी वाचले होते. (पुरावा नाही. पण ते तेव्हा हयात होते.) काँग्रेसला धरून धरून ती वाढली. मनोहर जोशी, प्रमोद नवलकर अशी मंडळी प्रथम विधान परिषदेवर निवडून आली ती काँग्रेसच्या सहकार्याने. नंतर शिवसेनेने प्रजासमाजवादी पक्षाशी युती केली आणि हेमचंद्र गुप्ते हे शिवसेनेचे पहिले महापौर झाले.

हळूहळू शिवसेनेने रूळ बदलले. मी आणीबाणीचा कट्टर विरोधक तर बाळासाहेबांचा इंदिरा गांधी याना पाठिंबा- मी आणि असेच बरेच जण शिवसेनेपासून मनाने दूर झालो.

माझ्या दृष्टीने शिवसेना काल (२२-६-२२) संपली. शिवसेना, मनसे, बाळसेना असे काही पक्ष काही काळ रहातील पण ५-१० वर्षात ते सर्व संपतील. त्यांचे मूल्य संपले आहे. अर्थात् अधिकृतपणे कोणीच संपत नाही. एखाद्या महापालिकेत २-३ नगरसेवक, एखादी ग्रामपंचायत असे अस्तित्त्व टिकून राहते.

महाराष्ट्राला एक प्रादेशिक पक्ष-किंवा विदर्भ, मराठवाडा, असे पाच सहा प्रादेशिक पक्ष असावेत जे फक्त आपापल्या भागातील प्रश्नांवर लक्ष केंद्रित करतील. तसा पक्ष म्हणून माझा शिवसेनेकडे कल होता. शिवसेनेशी संबंध राहिले नसले तरीही २२ तारखेला कोणीतरी जवळचे गेले अशीच भावना आहे.

उद्धव ठाकरेंना मी ओळखत नाही. ते चतुर राजकारणी आहेत की नाहीत ते मला माहीत नाही. फेसबुक लाइव्ह वर बोलताना ते जसे दिसतात, तोच त्यांचा खरा चेहरा वाटतो. त्यांच्यात आणि बाळासाहेबात काहीही साम्य नाही. पण वडिलांचा वारसा अचानकपणे झुगारून देता येत नाही ही त्यांची अडचण होती.

विश्वासदर्शक किवा अविश्वासदर्शक जो कोणता प्रस्ताव येईल तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसने व्हिप काढू नये . अजूनही बऱ्याच लोकांची घुसमट होत असेल त्याना कोंडून ठेवण्यात काय हशील? घेऊ दे सगळ्यांना मोकळा श्वास !

अर्थात् माझ्या या मताला किम्मत नाही हे मला माहीत आहे. पण मी वापरत असलेल्या या अभिव्यक्ती स्वातंत्र्याद्वारा मला कोणाच्याही भावना दुखवायच्या नसून उलट मी महाराष्ट्रातील हजारो लोकांच्या भावना व्यक्त करत आहे .

श्याम केळकर

उद्धव ठाकरे यांचं फेसबुक लाईव्ह पाहिलं. हे भावनिक आवाहन होतं. त्यात कुठलाही नाटकीपणा वाटला नाही. 'कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ' विषयी बोलताना त्यांच्या बोलण्यातली वेदना जाणवत होती.

सेनेचा मुख्यमंत्री होणार असल्यास मुख्यमंत्रीपद सोडायची तयारी उद्धव यांनी दर्शवली. शिवसेनाप्रमुख पद सोडायलाही आपण तयार आहोत, असं ते म्हणाले.

शिवसेना हा अत्याधिक भावनिक प्रकृती असलेला पक्ष आहे. कालपासूनच अनेक कार्यकर्ते भावुक झाले आहेत, काहीजण तर रडल्याचंही दिसलं.

गँगवारचं स्वरूप आलेल्या आजच्या राजकारणात उद्धव यांची भावनिक साद विसंगत किंवा संदर्भहीन वाटेल, अशी परिस्थिती आहे. बंडखोर आमदार त्याला कसा प्रतिसाद देतील, हे दिसेलच; पण उद्धव यांचं वेगळेपण अधोरेखित करणारं हे निवेदन होतं.

श्रीरंजन आवटे

केवळ, दिव्य भगवत्सेवेद्वारे मनुष्य जेव्हा आध्यात्मिकदृष्ट्या परिपक्व होतो तेव्हा त्याला भगवंतांच्या दिव्य नाम, रुप, गुण आणि लीला प्रकट होतात.

ही भगवद्गीता म्हणजे कृष्णभावनेचे विज्ञान आहे. केवळ सांसारिक पांडित्याद्वारे कोणीही कृष्णभावनाभावित होऊ शकत नाही. शुद्ध भावनायुक्त व्यक्तीचा सत्संग होण्याइतपत मनुष्याला भाग्यवान असावे लागते. श्रीकृष्णांच्या कृपेमुळे कृष्णभावनाभावित मनुष्याला साक्षात्कारी ज्ञान असते, कारण तो विशुद्ध भक्तिपूर्ण सेवेने तृप्त झालेला असतो. साक्षात्कारी किंवा अनुभूत ज्ञानाद्वारे परिपूर्णतेला प्राप्त होते. दिव्य ज्ञानाच्या आधारे मनुष्य आपल्या श्रद्धेमध्ये दृढ राहू शकतो. परंतु केवळ पुस्तकी ज्ञानाने तो सहजपणे मोहित होऊ शकतो आणि वरकरणी विरोधभासामुळे गोंधळून जाऊ शकतो. आत्मसाक्षात्कारी जीव हा वास्तविकपणे आत्मसंयमी असतो, कारण तो श्रीकृष्णांना शरण गेलेला असतो. तो दिव्य असतो, कारण त्याला सांसारिक पांडित्याशी मुळीच कर्तव्य नसते. सांसारिक विद्वत्ता आणि मानसिक तर्कवाद जरी इतरांना सोन्याप्रमाणे भासत असले तरी त्याच्या लेखी मात्र त्यांना खडे किंवा दगडापेक्षा अधिक मूल्य नसते.

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु ।
साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ।।९।।

सु-हृत्- स्वभावतःच हितचिंतक; **मित्र-** स्नेहमयी हितकारी; **अरि-** शत्रू; **उदासीन-** स्पर्धकांमधील तटस्थ; **मध्य-स्थ-** स्पर्धकांमधील मध्यस्थ; **द्वेष्य-** द्वेषी; **बन्धुषु-** आणि नातेवाईक किंवा हितचिंतक; **साधुषु-** पुण्यवान किंवा साधूमध्ये; **अपि-** सुद्धा; **च-** आणि; **पापेषु-** पापीमध्ये; **सम-बुद्धिः-** समबुद्धी असलेला; **विशिष्यते-** अत्यंत प्रगत असतो.

मनुष्य जेव्हा प्रामाणिक हितचिंतक, सुहृद, तटस्थ, मध्यस्थ, द्वेषी, मित्र आणि शत्रू, पुण्यवान आणि पापी या सर्वांकडे समबुद्धीने पाहतो, तेव्हा तो अधिक प्रगत किंवा विशेष मानला जातो.

योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः ।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ।।१०।।

योगी- योगी; **युञ्जीत-** कृष्णभावनेत एकाग्र झाले पाहिजे; **सततम्-** सतत; **आत्मानम्-** स्वतः (शरीर, मन आणि आत्म्याद्वारे); **रहसि-** एकांतस्थळी; **स्थितः-** स्थित राहून; **एकाकी-** एकदा; **यत-चित्त-आत्मा-** मनामध्ये सतत सावध असणारा; **निराशीः-** इतर कोणत्याही गोष्टींद्वारे आकर्षित झाल्याविना; **अपरिग्रहः-** स्वामित्व किंवा संग्रहाच्या भावनेपासून मुक्त असलेला.

योगी व्यक्तीने नेहमी आपले शरीर, मन आणि आत्मा भगवंतांच्या ठायी युक्त केले पाहिजे. त्याने एकांतस्थळी एकटे राहावे आणि काळजीपूर्वक मनाला सतत संयमित केले पाहिजे. त्याने आकांक्षा आणि संग्रहाच्या किंवा स्वामित्वाच्या भावनेपासून मुक्त असले पाहिजे.

तात्पर्य : श्रीकृष्णांचा साक्षात्कार, ब्रह्म, परमात्मा आणि पुरुषोत्तम श्री भगवान या तीन विविध रुपांमध्ये होतो.थोडक्यात, कृष्णभावना म्हणजे दिव्य प्रेममयी भगवत्सेवेमध्ये युक्त होणे होय. परंतु जे निर्विशेष ब्रह्म किंवा अंतर्यामी परमात्मा रुपावर आसक्त आहेत ते सुद्धा अंशतः कृष्णभावनाभावितच असतात, कारण निर्विशेष ब्रह्म किंवा अंतर्यामी परमात्मा रुपावर आसक्त आहेत ते सुद्धा अंशतः कृष्णभावनाभावितच असतात, कारण निर्विशेष ब्रह्म म्हणजे श्रीकृष्णांचेच आध्यात्मिक किरण आहेत आणि परमात्मा हे श्रीकृष्णांचे सर्वव्यापी आंशिक विस्तार रुप आहे. याप्रमाणे निर्विशेषवादी आणि ध्यानयोगी हे सुद्धा अप्रत्यक्षपणे कृष्णभावनाभावित असतात. प्रत्यक्षपणे कृष्णभावनाभावित असणारा मनुष्य हा सर्वोत्तम योगी असतो. कारण अशा भक्ताला ब्रह्म आणि परमात्म्याचे ज्ञान असते. त्याला परम सत्याचे परिपूर्ण ज्ञान असते, तर निर्विशेषवादी आणि ध्यानवादी योगी हे पूर्णरुपाने कृष्णभावनाभावित नसतात.

(क्रमशः)

लोकसंसद

पावसाने दिली ओढ दाटले चिंतेच ढग



जून महिना संपत आला तरी नेमेचि येणाऱ्या पावसाने दडी मारली आहे. मागील काही दिवस अधून मधून पडणारा पाऊस अचानक गायब झाल्याने पावसाच्या धारांनी काहीसा सुखावलेला मुंबईकर 'काले मेघा काले मेघा पानी तो बरसा दो...' असे म्हणत आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. दुसरीकडे पाऊस नसल्याने राज्यातील शेतकऱ्यांपुढे दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे. यंदा हवामान खात्याने जून ते सप्टेंबरच्या दरम्यान सरासरीच्या ९६ टक्के ते १०४ टक्के पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे. जून महिन्यातही चांगला पाऊस होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला होता. पण पावसाने ओढ दिल्यामुळे हवामान खात्याचा अंदाज चुकला आहे. जूनच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत राज्यातील ३६ पैकी २२ जिल्ह्यांमध्ये अपेक्षित सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. राज्यात सरासरीच्या केवळ ३८ टक्के पाऊस झाला आहे. मुंबईत कुलाबा येथे या सरासरीच्या केवळ ५४ टक्के तर सांताक्रूझ येथे सरासरीच्या ३६ टक्के पावसाची नोंद झाली आहे. मुंबईला पुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्रात पाऊस न झाल्याने पाणी साठ्याची पातळी खालावली आहे आणि धरणांत फक्त ११ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यात मुंबईकरांवर पाणीकपातीचे संकट ओढवणार आहे.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

सामाजिक बांधिलकी जपावी !

'पंढरीची वारी' हे महाराष्ट्राचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. 'गळ्यामंदी तुळसीमाळ, मस्तकी चंदनाचा टिळा मुखी विठूचे नाम, मनी माऊलीच्या भेटीचा लळा' असा हा वारकरी ज्याला आषाढी एकादशी जवळ आली कि भगवंत भेटीची आस लागते. मग पाय आपसूकच पंढरीच्या दिशेने वळू लागतात. खांद्यावर भगवी पताका माळून विठूनामाचा गजर करत तो वारीला निघतो. ऊन पावसाची तमा न बाळगता, तहानभूक विसरून माऊलीच्या भेटीसाठी निघालेला हा विठूभक्त जेव्हा दमतो, थकतो तेव्हा क्षणभर विश्रांतीसाठी थांबतो. अशावेळी त्याला चालण्याचे पुन्हा बळ मिळावे, त्याच्यात उत्साह यावा यासाठी पितांबरी आस्थापनाच्या वतीने दरवर्षी वारीमार्गावर वारकऱ्यांच्या पायाला तेल लावून मसाज केले जाते. पितांबरीचे स्वयंसेवक दमलेल्या वारकऱ्यांच्या पायांना पितांबरीचेच उत्पादन असलेले क्युअर ऑन वेदनाशामक तेल लावून मसाज करतात. कोरोना महामारीचा काळ वगळता गेल्या अनेक वर्षांपासून पितांबरी हा सेवाभावी उपक्रम अविरतपणे राबवत आहे. उद्योगासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे कंपनीचे मालक रवींद्र प्रभुदेसाई यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाचा दरवर्षी हजारो वारकरी लाभ घेत असतात. यंदाही त्यांच्या स्वयंसेवकांचा चमू पंढरीच्या दिशेने निघाल्याचे वृत्त वाचनात आले. राज्यात अनेक औषधी कंपन्या आहेत ज्या राज्यात व्यवसाय करून आज मोठ्या झाल्या आहेत. त्यांनीही पितांबरीच्या या उपक्रमातून बोध घेऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी पुढाकार घ्यावा !

- जगन घाणेकर, घाटकोपर

स्वार्थी सत्तासंघर्ष

सध्या महाराष्ट्रात सुरु असलेल्या सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर दोन ध्वनीचित्रफिती समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहेत. एक आहे 'सिंहासन' या गाजलेल्या मराठी सिनेमातील तर दुसरी आहे 'रानबाजार' या मराठी वेबमालिकेतील. 'सिंहासन' मधील पत्रकाराच्या भूमिकेतील निळू फुले त्यांच्यासोबत राजकारणाबद्दल चर्चा करणाऱ्या न्हाव्याच्या भूमिकेतील राजा मयेकरांना सांगतात शिंदे आले काय, दाभाडे आले काय तुमच्या आयुष्यात काय फरक पडणार आहे?. तर 'रानबाजार'मधील पत्रकाराच्या भूमिकेतील मकरंद अनासपुरे त्यातील सत्तासंघर्षावर भाष्य करताना म्हणतात, सामान्य माणसांचा आता राजकारण्यांवर विश्वास राहिलेला नाही. खोटी आश्वासने, अभद्र युत्या यांची लोकांना सवय झाली आहे. पक्षनिष्ठा, पक्षाची तत्वे या सगळ्या पुस्तकी गोष्टी झाल्या आहेत. पक्षाच्या झेंड्याचा रंग कुठलाही असला तरी सत्तेचा रंग महत्त्वाचा ! किती समर्पक आहेत ही दोन्ही भाष्ये!! समाजातील घटनांचे प्रतिबिंब चित्रपटांत, मालिकेत उमटत असते असे म्हटले जाते ते खरंच. म्हणूनच १९७९ साली प्रदर्शित झालेला सिंहासन चित्रपट ते २०२२ साली प्रदर्शित झालेली रानबाजार ही वेबमालिका यात जवळपास चार दशकाचा काळ लोटला तरी सत्तासंघर्ष काही थांबलेला नाही हेच खरे !

- दीपक गुंडये, वरळी

पालीत वाहतूक कोंडीची समस्या

। पाली । वार्ताहर ।

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात वाहतूक कोंडीची समस्या जटील झाली आहे. अरुंद रस्ते, नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालक, अवजड आणि डम्पर वाहतूक यामुळे वाहतूक कोंडी सोडवणे अवघड झाले आहे. याशिवाय, १०-१२ वर्षांपासून बाह्यवळण मार्ग अडचणीत अडकल्याने वाहतूक कोंडीवर ठोस उपाययोजना होऊ शकलेली नाही.

पालीत डम्पर, ट्रॅक्टर व लक्झरी वाहनांची नियमित ये-जा सुरू असते. त्यामुळे बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येणारे भाविक व पर्यटकांच्या वाहनांना मार्ग मिळत नाही. त्यात अनेक वाहनचालक नियमांचे उल्लंघन करत असल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे. दिवस-रात्र कोंडी होत असल्याने नागरिक अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. पाली हे तालुक्याचे ठिकाण आहे. अनेक नागरिक कामानिमित्त व विद्यार्थी शाळा व कॉलेजमध्ये येत असतात. त्यात येथील रस्ते अरुंद आहेत. अशा अरुंद रस्त्याच्या दुतर्फा अनेक जण दुचाकी व चारचाकी उभी करून खरेदी किंवा इतर कामासाठी जातात. यामुळे वाहतूक कोंडीत वाढ होत असल्याने अन्य वाहनचालक, भाविक, पादचारी व विद्यार्थ्यांची येथून वाट काढताना मोठी गैरसोय होते.

अनेक दुकाने, टपऱ्या व इमारती रस्त्याच्या अगदी कडेला आहेत. काही ठिकाणी तर अनधिकृत बांधकामेही आहेत. बांधकामाचे साहित्यही रस्त्यावर पडलेले असते. यामुळे येथून मार्ग काढणे वाहनचालकांना शक्य होत नाही. शाळा व महाविद्यालयाच्या वेळेत वाहतुकीवर प्रचंड ताण येत असल्याने अनेक ठिकाणी वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विविध नाक्यांवर पोलीस तैनात असतात.

मात्र या कारणांमुळे कोंडी सोडवणे अवघड होते. त्यामुळे यावर ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

कोंडीची ठिकाणे

बल्लाळेश्वर मंदिर ते ग. बा. वडेर हायस्कूल, मारुती मंदिर चौक ते जुने एस.टी. स्टॅण्ड, गांधी चौक ते बाजारपेठ, कुंभार आळी, बँक ऑफ इंडिया, हटाळेश्वर चौक ते मिनीडोअर स्टॅण्ड, बसस्थानक ते गांधी चौक, एसबीआय बँक ते गांधी चौक अशा विविध ठिकाणी वाहतूक कोंडी होत असते.

इतर वाहनांची वर्दळ

मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था आणि वाहतूक कोंडीमुळे कोकणाकडे जाणारे प्रवासी पालीतून विळेमार्गे माणगाववरून किंवा वाकणवरून पुढे जातात. तर कोकणाकडून येणारी वाहने माणगाववरून विळेमार्गे पालीतून खोपोलीमार्गे पुणे-मुंबईकडे जातात. परिणामी, पालीत वाहनांची रेलचेल वाढून अधिक वाहतूक कोंडी होते.

'ई-केवायसी प्रमाणिकरण पूर्ण करावे'

। अलिबाग । वार्ताहर ।

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत जिल्ह्यात एकूण १ लाख ७३ हजार ९३८ लाभार्थ्यांनी नोंदणी केली असून, त्यापैकी १ लाख ४३ हजार २२३ लाभार्थ्यांची आधारकार्डची माहिती पी.एम.किसान पोर्टलवर नोंदविण्यात आली आहे. केंद्र शासनाकडील नवीन नियमानुसार पात्र लाभार्थ्यांचा पी.एम.किसान योजनेचा लाभ हा त्यांचे आधारकार्ड लिंक असलेल्या बँक खात्यातच जमा केला जाणार आहे. त्यामुळे नोंदणीकृत पात्र लाभार्थ्यांना पी.एम. किसान पोर्टलवर ई-केवायसी प्रमाणीकरणाची प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली असून शेतकऱ्यांना ई-केवायसी पात्र लाभार्थ्यांनी दि.३१ जुलै २०२२ अखेरपर्यंत ई-केवायसी प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

महत्त्वाचे

योग दिनानिमित्त कार्यक्रम

। पनवेल । वार्ताहर ।

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नवप्रवाह फाऊंडेशन संस्थेतर्फे एक दिवसीय योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवप्रवाह फाऊंडेशन संस्था महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करत असते. प्रसंगी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मंगळवारी (ता.२१) योगा कवायती कार्यक्रम कळंबोली येथे साजरा करण्यात आला. संस्थेच्या संस्थापिका अरुणा सावंत यांनी महिलांना योगासनाचे महत्त्व सांगून त्यांना आरोग्य आणि योग यावर मार्गदर्शन केले. संस्थेच्या वतीने योगासन वर्ग कायमस्वरूपी सुरू करावा, अशी महिलांनी अपेक्षा व्यक्त केली. कळंबोलीतील अनेक महिलांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संस्थेचे सभासद आणि सुवर्णा चव्हाण यांचे विशेष सहकार्य लाभले.

चौक वनविभागात वृक्षारोपण

। रसायनी । वार्ताहर ।

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चौक, खालापूर, कर्जत याच्या विद्यमानातून चौक येथे फॉरेस्ट ऑफिस समोरील मोकळ्या जागेत वृक्ष रोपण व त्याचे संवर्धन करण्यात आले.यावेळी असंख्य, सामजिक कार्यकर्ते , लोक प्रतिनिधी सेवा भावी संस्थेचे पदाधिकारी, वृक्षप्रेमी, नागरिक वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

धाटाव विद्यालयाचा १०० टक्के निकाल

। रोहा । वार्ताहर ।

सुएसोच्या प.पू.पांडुरंग शास्त्री औद्योगिक विद्यालय धाटाव या.रोहे या विद्यालयाचा एस.एस.सी. परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून तुषार वाघमारे या विद्यार्थ्याने ७३ टक्के मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकावला आहे.

एस.एस.सी. परीक्षेचा निकाल चांगला लावण्याची परंपरा कायम राखली असल्याने या निकालाचे सर्वत्र स्वागत होताना दिसत आहे. तर विद्यालयात द्वितीय क्र. नंदिनी नामदेव मुंडे ७०.८० टक्के तुतीय क्र.संजना संजय साह व टक्के, विकीकुमार संजय साह ७०.४० टक्के,चतुर्थ क्र.यश महेश काटम ७०.२० टक्के, तर पंचम क्र.प्रतिक पांडुरंग भोकटे ६९.४० टक्के यांनी पटकाविले आहेत.विद्यार्थी वर्गाने मिळविलेल्या यशाबद्दल सर्व संस्थाचालक व स्कूल कमिटीचे सर्व पदाधिकारी व मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंदाने विद्यार्थी वर्गाचे अभिनंदन केले.

वीज बिल थकल्याने पथदिवे बंद

नागरिकांत भीतीचे वातावरण

। नागोठणे । वार्ताहर ।

शासनाकडून भरण्यात येणारे पथदिव्यांचे वीज देयक न भरल्याने नागोठण्यासह विभागातील ग्रामपंचायतींचे पथदिवे वी वितरण कंपनीकडून बंद करण्यात आले आहेत. तर नागोठणे शहराच्या विविध भागातील पदपथावरील पथ दिवे वीज बिल न भरल्याने वीज वितरण कंपनीच्या नागोठणे कार्यालयाकडून दोन दिवसांपूर्वीच बंद करण्यात आले आहेत. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर पदपथावरील हा वीजपुरवठा बंद झाल्याने शहरातील सर्व अंतर्गत रस्त्यावरून काळोखात चालण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. सध्या पावसाळ्याच्या तोंडावर पथदिवे बंद झाल्याने रात्री रस्त्यावरून चालतांना नागरिकांच्या मनात धडकी भरत असल्याने त्यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या वर्षाच्या गणेशोत्सवापुर्वी वीज वितरणने थकित देयकामुळे अशाचप्रकारे पथदिवे बंद केल्याने नागोठणे ग्रामपंचायतीकडून सुमारे दोन लाख रुपये थकीत बिल भरल्यानंतर पथदिव्यांचा हा वीजपुरवठा सुरळीत झाला होता.

आता शासनाकडून भरण्यात येणारे वीज देयक गेली ३ महिने थकित असल्याने नागोठण्यासह विभागातील ग्रामपंचायतींचे पथदिवे बंद करण्यात आल्याची माहिती विजवितरणचे नागोठण्यातील कनिष्ठ अभियंता वैभव गायकवाड यांनी दिली.

पदाजी पांडुरंग मुंबईकर शाळेचा १०० टक्के निकाल

। उरण । वार्ताहर ।

जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे पदाजी पांडुरंग मुंबईकर इंग्लिश मिडियम स्कूल,वेश्वी शाळेचा इयत्ता दहावीचा बोर्डाचा २०२१-२२ वर्षाचा एकूण निकाल सलग चौथ्या वर्षीही १०० टक्के एवढा लागला. कुमारी सिमरन विलास मुंबईकर ८८.४० टक्के गुण मिळवून प्रथम तर कुमारी सलोनी समीर पाटील ८८.०० टक्के गुण मिळवून द्वितीय तसेच कुमारी श्रेया रणधीर घरत ८७.६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. शाळेच्या एकूण निकालामध्ये २१ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य तर ३२ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवून घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जे.एम.म्हात्रे, संस्थेचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे,जे. के मढवी, चंद्रकांत मुंबईकर, प्रितम टकले यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पावसाळ्यातील रानभाजी महागली

। पाली । वार्ताहर ।

पावसाळा सुरू झाला की हमखास मिळणारे रानफळ म्हणजे अळू. सध्या जिल्ह्यातील बाजारात अळू विक्रीसाठी आले आहेत. मात्र मागीलवर्षी १० रुपयांना मिळणारा पाच अळूचा वाटा यावर्षी २० रुपयांना मिळत आहे. तरीही खवय्ये खरेदी करताना दिसत आहेत. आदिवासी महिला ही अळूची फळे विक्रीसाठी घेऊन येतात. साधारण पाऊस पडण्याआधी ही फळे तयार होतात आणि पावसाळा सुरू झाला की विक्रीसाठी येतात. फक्त याच हंगामात मिळणारी चॉकलेटी रंगांची, गोल आकाराची आवळ्या एवढी ही आंबट गोडफळे अनेकांना आवडतात. त्यामुळे आवर्जून त्याची खरेदी केली जाते. पावसाचा जोर वाढला की यामध्ये कीड पडून फळे खराब होतात. त्यानंतर थेट पुढील वर्षी येतात. त्यामुळे आता महाग मिळणारी फळे खवय्ये आवर्जून खरेदी करतात. रानात अळूची झाडे कमी झाली आहेत. तसेच या फळांच्या झाडांची लागवड कोणी करत नाही. त्यामुळे आवक कमी आहे. महागाईही वाढली आहे. त्यामुळे अळूच्या किमती वाढल्या आहेत. तरी देखील खवय्ये खरेदी करतात.

फुंडे महाविद्यालयात वृक्षारोपण

। उरण । वार्ताहर ।

फुंडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने,वसुंधरा अभियाना अंतर्गत व राष्ट्रीय छात्र सेनेच्या स्थापनेस ७५ वर्षपूर्ती निमित्त वृक्षारोपण करण्यात आले.महाविद्यालयाचे प्राचार्य,डॉ.पी.जी.पवार यांचे हस्ते वृक्ष लावण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य, डॉ.विलास महाले, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. राम गोसावी,डॉ.आमोद ठक्कर,डॉ. संदीप घोडके,प्रा.दिलीप केंगार, डॉ.विद्या नावडकर , डॉ. एम. सी. सोनवणे उपस्थित होते. रा. से. योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. डी.धिंदळे, डॉ. आर. एस. जावळे, प्रा. एस. टी. गोतपागर तसेच प्रा. संतोष देसाई उपस्थित होते. रा. से. यो. स्वयंसेवक व रा. छात्र सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्ह्यात कृषी संजीवनी मोहिमेचे आयोजन

श्रीमती बाणखेले यांचे प्रतिपादन'

। अलिबाग । वार्ताहर ।

खरीप हंगाम २०२२ यशस्वी करण्यासाठी व आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी राज्यातील कृषी विभागाचे अधिकारी/ कर्मचारी, कृषी विभाग जिल्हा परिषद, कृषी विद्यापीठे/ कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, कृषीमित्र शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करीत आहेत. त्यानुसार दि.२५ जून ते दि.०१ जुलै या कालावधीत प्रत्येक दिवशी महत्त्वाच्या मोहिमांवर विशेष भर देवून कृषी संजीवनी मोहीम साजरा करण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या कालावधीमध्ये संबंधित विषयांबाबत जिल्ह्यात प्रचार व प्रसिद्धी करण्यात येणार असून गावोगावी शेतीशाळा, चर्चासत्र, वेबिनार, प्रात्यक्षिके, सभा प्रशिक्षण, शिवारफेरी यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच राज्यातील रिसोर्स बँकेतील पुरस्कारप्राप्त प्रगतशील शेतकऱ्यांचे सुध्दा मार्गदर्शन या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळणार आहे. तसेच अधिक माहितीसाठी आपल्या गावाच्या कृषी सहाय्यक तसेच नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती बाणखेले यांनी कळविले आहे.

चिवणी माशांना खवय्यांची पसंती

। अलिबाग । वार्ताहर ।

समुद्राची मासळी सागरी मासेमारी बंदीमुळे येणे बंद झाले आहे. त्यामुळे आता अलिबागकरांना खाडीच्या मासळीला मागणी वाढत चालली आहे. यात चवीला व खायला सर्वांत रुचकर असलेल्या चिवणी माशांना भलतीच मागणी वाढली आहे. दरवर्षी समुद्री मासेमारी बंदीमुळे चिवणी माशांना मागणी वाढत आहे. या मासळीमुळे स्थानिकांना चांगला रोजगार मिळत असून खवय्यांचीदेखील चिवणी मासे खरेदी करण्यासाठी बाजारपेठेकडे पावले वळू लागली आहेत.

मत्स्यप्रजननाच्या काळात समुद्री मासेमारीवर बंदी येते. त्यामुळे पुढील तीन महिने अलिबागकरांना नदी-तलाव व खाडीच्या मासळीवर अवलंबून राहावे लागते. नदी-तलाव व खाडीतून मिळणाऱ्या गावठी

मासळीला पावसाळ्यात चांगली मागणी असते. यात खाडीत मिळणाऱ्या चिवणी माशांना चांगला भाव मिळतो. चिवणी माशांचे वाटे १०० पासून ते २०० रुपयांपर्यंत विक्रीसाठी ठेवले जातात. चांगला भाव मिळत असल्याने स्थानिक मासेमारांनादेखील चांगला रोजगार प्राप्त होत आहे. सध्या बाजारपेठेत चिवणी माशांना चांगली मागणी असनू, दूरवरून ग्राहक पडेल त्या किमतीला चिवणी खरेदी करण्यासाठी येतात.

भात पेरणी अंतिम टप्प्यात

। गोवे कोलाड । वार्ताहर ।

संपुर्ण रायगड जिल्ह्यात जुन महिना संपता संपता पावसाने समाधानकारक हजेरी लावली आहे. खरिपाच्या लांबलेल्या पेरणीला जोरदार बळीराजाने सुरुवात केली असून तो शेतीकामात आता व्यस्त झाला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बळीराजामध्ये देखील आंनदाचे वातावरण पसरले आहे. या समाधानकारक पावसामुळे शेतीच्या कामांना देखील चांगल्या पद्धतीत सुरुवात झाली असून सर्जा राजाची जोडी बळीराजा आता नांगरणीसाठी

सज्ज झाला असल्याचे दिसून येत आहे. यावर्षी पाऊस अधिक लांबला त्यामुळे बळीराजाची खरीप हंगामातील भात पेरणी देखील लांबली परंतु ऊशिरा का होईना पावसाने सोमवारी सकाळपासूनच दमदार हजेरी लावत सुरुवात करून सर्वच ठिकाणी पाणीच पाणी झाले.यामुळे शेतक्यांची भात पेरणीची काम आता अंतिम टप्प्यात आली आहेत.

कंपनीविरोधात स्थानिकांचे गेट आंदोलन

। रसायनी । वार्ताहर ।

इंटरनॅशनल कारगो टर्मिनल ॲंड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने सन २०१६ साली कळंबुसरे येथील शेतक-याची शेतजमीन खरेदी केली आहे. यावेळी शेतजमीनीच्या जमीन मालक शेतकऱ्यांना लिखीत व तोंडी आश्वासन देण्यात आले आहे. याअगोदर कंपनीने १०७ शेतकऱ्यांपैकी सन २०१७ मध्ये ३५ कामगार सेवेत घेतले. सन २०२२ मध्ये २५ कामगार घेण्यासंदर्भात नोटिस दिल्या आहेत.तर उर्वरित ४७ कामगारांचा प्रश्न प्रलंबित असून सदर जागेत तीन वर्षाच्या आत कंपनी उभारून त्यामध्ये नोकरी देण्यात येईल आणि जर तीन वर्षाच्या आत नोकरी दिली नाही तर तीन वर्षाच्या नंतर त्या बदल्यात दर महा पगार देण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख असतानाही शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याने त्यांनी बहुजन मुक्ती पार्टीचे उपाध्यक्ष संतोषभाई घरत यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार दि.२३ रोजी दुपारी कंपनी गेटसमोर शेतकऱ्यांच्या शेतजमिनी खरेदीच्या बदल्यात त्यांना नोकरी व पगार न दिल्याच्या विरोधात गेट आंदोलन केले. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी कुटुंब उपस्थित होते.

कृषी विद्यालयात वृक्ष महोत्सव साजरा

। नेरळ । वार्ताहर ।

जगातील पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आणि वृक्ष महोत्सव निमित्त कर्जत तालुक्यातील वारे येथील प्राचार्य चंद्रकांत म्हसे कृषी विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले.त्यावेळी पॉलीपेपटाईड गृप अंबरनाथ यांच्या वतीने औषधी वनस्पतींची लागवडीचा कार्यक्रम संपन्न झाला पर्यावरणाचे रक्षण जंगलसंपतीचे संवर्धनासाठी वृक्षारोपण व त्याचे संगोपन करण्यासाठी या विद्यालयाकडून नेहमीच असे उपक्रम राबविले जातात,यावेळी ही जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वारे कृषी विद्यालय परिसर आणि

ग्रामपंचाय हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी विविध प्रकारच्या झाडाच्या रोपांची लागवड करण्यात आली.

यावेळी अशोक जगे, सुधीर नवांगुळ, सचिन दारव्हेकर, सुनील पोखरकर, बी एम गवळी, एन डी पाटील, जी के वाघ, ए एस गायकर, आर जे काळे, सचिन गायकवाड, गजानन म्हसे यांसह मोठया संख्येने विद्यार्थी ग्रामस्थ उपस्थित होते.

तीन तपानंतरही त्यांच्या मैत्रीचे बंध अतूट

माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

माजी विद्यार्थी एकत्र येऊन विद्यार्थी स्नेहसंमेलन साजरी करण्याची संकल्पना आज सर्वत्र राबविली जाते. एकेकाळी विद्यार्थी मात्र आज शाळा संस्थापक बनलेल्या तसेच मोठ्या हुद्द्यांवर गेलेल्या माजी विद्यार्थ्यांचे आगळेवेगळे स्नेहसंमेलन नुकतेच पार पडले. सन १९८६ च्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत तब्बल ३५ ते ३८ वर्षांनी स्नेहसंमेलन अत्यंत उत्साही वातावरणात साजरे केले. सुधागड तालुक्यातील रविराज फार्म हाऊस उन्हेरे येथे नुकतेच हे संमेलन पार पडले. या संमेलनास जवळच्या मुंबई पुणे शहरातूनच नव्हे तर दूरच्या सांगली मिरज शहरातुन देखील माजी विद्यार्थी उपस्थित होते. हे सर्व विद्यार्थी आज मोठमोठ्या हुद्द्यावर असल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर समाधान झळकताना दिसले. कुणी शाळा संस्थापक, कुणी संचालक, कुणी इंजिनिअर, कुणी शिक्षक, कुणी वकील, व्यवसायिक, उद्योजक अशी मोठमोठी पदे सारेच भूषवित आहेत. राष्ट्रसेवा करीत असल्याचे यावेळी दिसून आले. सुधागड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष रवींद्र लिमये त्यांच्या पत्नीसह वडेर बॅचच्या स्नेहसंमेलनात सहभागी झाले होते.

सारेच आपल्या बालपणीच्या आठवणीत हरवून गेले. शलाका गद्रे यांनी केलेल्या खुमासदार निवेदनाने कार्यक्रमाला रंगत आणली. प्रियांका गोडबोले, किशोर खंडागळे, ज्योत्स्ना भणगे, प्रमोद द्रविड यांनी सुमधुर गाणी सादर करून वातावरण संगीतमय केले. जुन्या आठवणी, गंमतीशीर किस्से, गप्पागोष्टी, नृत्य, विनोद, अभिनय, संगीत आदी खेळांनी माजी विद्यार्थ्यांनी बालपणाचा आनंद लुटला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन सचिन दाभोलकर यांनी केले. दाभोळकर यांनी आपल्या सहकार्यांना गत स्मृतीं जागविन्यासाठी त्यांना तालुक्यातील प्रेक्षणीय स्थळांची माहिती असलेले सुधागड दर्शन हे पुस्तक भेट दिले. याप्रसंगी

कोरोना काळात मृत्युमुखी पडलेल्या आपल्या मित्र व स्नेही परिवारातील सदस्यांच्या आठवणी देखील जागविण्यात आल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवराम पवार, सीमा मपारा,जितेंद्र जैन, सुधीर मढवी, उदय दुर्गे, ॲंड. विलास माळी, ॲंड. रमेश खंडागळे, प्रदीप मेहता, संकेत पार्टे, आदींनी विशेष प्रयत्न केले. या संमेलनात निधी गोळा करून सामाजिक व शैक्षणिक उपक्रमास देण्याचा महत्वपूर्ण संकल्प यावेळी करण्यात आला.

नेरळ पूर्व भागाला महापुराचा धोका

बांधकाम व्यावसायिकाकडून अतिक्रमण

अरुंद नाल्यावर पुलांचे बांधकाम सुरू

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ पूर्व भागात अनेक त्रुटींमुळे मागील काही वर्षे पावसाळ्यात महापुराची पाणी घरात घुसून मोठे नुकसान होत असते. यावर्षी तेथून वाहणाऱ्या अरुंद नाल्यांवर बांधकाम व्यावसायिक यांच्याकडून पूल बांधले जात आहेत. त्यामुळे यावर्षी नेरळ पूर्व भागातील निर्माण नगरी, गंगानगर आणि मातोश्रीनागर भागात यावर्षीदेखील पाणी तुंबून राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्याच्या कडेने वाहणाऱ्या नाल्यावर अनधिकृतपणे पूल बांधणायचे काम तात्काळ थांबवावे, अशी मागणी स्थानिकांनी रायगड जिल्हा परिषदेकडे निवेदन देऊन केली आहे.

नेरळ हद्दीमध्ये नेरळ कळंब राज्य मार्ग क्र. १०९ रस्त्याला लागून मातोश्रीनगर भागामध्ये रस्त्यालगतच्या जमीन मालकांनी स्लॅब ड्रेनचे काम सुरु केले आहे. सदरचा रस्ता हा आपल्या अखत्यारीत येत आहे. सदर स्लॅब ड्रेनचे पूल बांधण्याच्या कामास स्थानिक भागातील रहिवाशांनी हरकत घेतली आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार सदरचा नाला हा अरुंद असून, तो रुंदीकरण करणे आवश्यक आहे, अशी स्थानिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. याच नाल्यामधून पावसाळ्यमध्ये नाल्यामधून पाणी वाहून जात असते. मात्र, अतिवृष्टी झाली की नाल्यातील पाणी आजूबाजूच्या घरांमध्ये घुसते आणि त्यामुळे महापुराचा फटका सर्वांना बसत असतो. नाल्यावर यापूर्वीदेखील खासगी जमीनधारकांनी मोठ्या प्रमाणात स्लॅब ड्रेनची कामे झाली आहेत, ती सर्व कामे नष्ट करून स्थानिकांना दिलासा देण्याची गरज आहे.

> मागील काही वर्षे पाणी घरात घुसत असल्याने स्थानिकांनी या नाल्यावरील सर्व साकव पूल तोडून टाकण्याची मागणी केली आहे. त्याचवेळी त्या नाल्याचे खोलीकरण करून नाल्याच्या कडेला झालेली अनधिकृत बांधकामे तोडून टाकण्याची मागणी केली आहे.
> – श्रीराम राणे, प्रभारी तालुका चिटणीस, शेकाप

याबाबत गंगानगर, मातोश्रीनागर आणि निर्माणनगरी भागातील स्थानिकांनी रायगड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग उपअभियंता, नेरळ ग्रामपंचायत यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. या नाल्यावर सुरु असलेले अतिक्रमणे तात्काळ थांबवावे आणि नाल्यावरील पूल तोडून टाकण्यात, अशी मागणी स्थानिकांनी केली असल्याची माहिती श्रीराम राणे यांनी दिली आहे.

भिंत नाल्याला की भूखंडाला?

चर्चेला ऊत

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमध्ये पाच लाख रुपये खर्चातून कल्याण-कर्जत रस्त्यावरील नाल्यात संरक्षण भिंत बांधली जात आहे. मात्र, त्या भागात नाल्याच्या कडेला धोकादायक असलेल्या घरांना संरक्षण भिंतींचा आधार देण्याची गरज असताना एकही घर नसलेल्या ठिकाणी ती संरक्षण भिंत बांधली जात आहे. दरम्यान, संरक्षण भिंत त्या भागातील भूखंड सुरक्षित करण्यासाठी बांधली जात असून, शासनाचे पाच लाख रुपयांचा वायफळ खर्च केला जात असल्याचादेखील आरोप केला जात आहे. तर स्थानिकांनी मागील पावसाळ्यात आलेल्या महापुराचे पाणी त्या भागात घुसले असल्याने त्या ठिकाणी बांधण्याची मागणी केली होती.

नेरळ गावातील राजेंद्रगुरुनगर भागातून वाहणाऱ्या नाल्याच्या जवळ घरे निर्माण झाली असून, त्यातील कोणत्याही घराचे बांधकाम शासनाकडून अद्याप धोकादायक ठरविण्यात आलेले नाही. त्यात त्या ठिकाणी असलेला नाला हा कल्याण-कर्जत रस्त्यावरून नेरळ रेल्वे स्थानकापर्यंत किमान ५०० मीटर लांबीचा आहे. असे असताना केवळ ५० मीटर भागात संरक्षण भिंत बांधण्याचे काम जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून केले जात आहे. त्यात सध्या ज्या ठिकाणी पाच लाखांचा निधी खर्च करून नाल्यात संरक्षण भिंत बांधली जात आहे, त्या ठिकाणी एकही घर नाही आणि जवळपास ५० मीटर अलीकडेदेखील घर नाही. असे असताना शासनाचे पाच लाख रुपये कोणासाठी आणि कशासाठी खर्च केले जात आहेत, असा प्रश्न आता विचारला जात आहे. त्याचवेळी त्या नाल्याला संरक्षण भिंत बांधायची होती तर ती कल्याण-कर्जत रस्त्यावरील पुलापासून बांधण्याची आवश्यकता होती.

नाल्याच्या आजूबाजूला धोकादायक अवस्थेत घरे असतील तर त्या घरांना पावसाच्या पाण्याचा धोका उद्भवू नये यासाठी नाल्याला अथवा नदीच्या पात्राला संरक्षण बांधली जाते. मग नाल्याच्या कडेला कोणतेही घर धोक्कादायक घर नसतानादेखील कोणत्या कारणांसाठी लाखो रुपये खर्चून संरक्षण भिंत बांधली जात आहे? याबद्दल नेरळ ग्रामपंचायतीमध्ये जोरदार चर्चा तर त्या संरक्षण भिंत बांधण्यात येत असलेल्या ठिकाणी कोणाचे मालिकेचे भूखंड आहेत? याचा शोध घेण्याची मागणीदेखील पुढे येत आहे.

रस्त्याची दुरवस्था

अलिबाग : अलिबागपासून पाच किलोमीटर अंतरावर असणाऱ्या आक्षी-रायवाडीतील मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली आहे. आधीच हा रस्ता अरुंद असल्याने वाहनचालकांना वाहन चालविणे जिकिरीचे होते. त्यातच हा रस्ता ठिकठिकाणी फुटला असल्याने त्याचा नाहक त्रास चालकांना सहन करावा लागत आहे. अलिबाग-रेवदंडा या मुख्य रस्त्यावर रायवाडी हे गाव असून, या भागातील रस्ता संपूर्ण सिमेंट काँक्रिटचा आहे. त्याच्या पुढील रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. परंतु, या रस्त्याला मुहूर्त कधी मिळणार, असा प्रश्न स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांमधून होत आहे. संबंधित विभागाने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

भारत मुक्ती मोर्चाकडून 'भारत बंद'ची हाक

। रसायनी । वार्ताहर ।

देशातगेल्याकाहीदिवसापासून ज्ञानव्यापी मज्जिद, भोंगे, आणि नुपुर शर्माच्या माध्यमातून हजरत महंमद पैंगबर यांचे अवमान करणारे वक्तव्य या घटना घडवून आरएसएस देशात हिंदू, मुस्लिम दंगली घडवून देशाची एकता व अखंडता तोडण्याचा प्रयत्न करत आहे, अशा देशविघातक शक्तीविरोधात राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा, भारत मुक्ती मोर्चा या संघटनांचे राष्ट्रीय संयोजक/अध्यक्ष वामन मेश्राम यांनी दि. २५ जून रोजी भारत बंदचे आवाहन केले आहे.

या बंदला पनवेलसह रायगड जिल्ह्यात यशस्वी करण्यासाठी आणि जनतेला या बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यासाठी पत्रकार परिषद घेण्यात आली. या बंदच्या आवाहनाला समाजातून चांगले सहकार्य मिळत आहे, अनेक पक्ष सघटनांनी बंदला समर्थन दिले आहे, अशी माहिती बहुजन क्रांती मोर्चाचे सहसंयोजक मनोज महाले यांनी दिली आहे. यावेळी बहुजन मुक्ती पार्टीचे प्रवीण पाटील, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चाचे मनोज रामधरणे, छत्रपती क्रांती सेनेचे श्रीयश म्हस्कर, राष्ट्रीय किसान मोर्चाचे मधुकर म्हात्रे, राष्ट्रीय मुस्लीम मोर्चाचे मोलाना मोहसीन आदी उपस्थित होते.

तलाठी कार्यालयाची दुरवस्था

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव, मोर्बा, श्रीवर्धन महामार्गावर साई हे महत्त्वाचे गाव असून, या गावात तलाठी कार्यालय असून नसल्यासारखे आहे. कारण, तलाठी कार्यालयाच्या इमारतीची पार दुरवस्था झालेली आहे.

साईमधीलतलाठीकार्यालयाच्या इमारतीचे सर्व पत्रे उडालेले असून, खिडक्या, दरवाजे मोडकळीस आलेले आहेत, त्यामुळे तलाठ्यांना येथे बसण्यास गैरसोय झालेले आहे. त्यातच नेटची कमतरता व विजेचा खेळखंडोबा या सर्व कारणांमुळे साई कार्यालयातील तलाठी संबंधित सर्व कामे परिसरातील लोकांना मोर्बा येथे स्थलांतर केलेल्या ठिकाणी जाऊन करावे लागत आहे. त्यातच एखाद्या छोट्या कामासाठीसुद्धा हेलपाटे घालावे लागत आहे. कारण, नेहमीच तलाठी असतातच असे नाही, म्हणून वयस्कर मंडळींना याचा खूप त्रास सहन करावा लागत आहे.

साई परिसरातील साई गाव, विहूले, डोंगरोळी, विहूलेवाडी, काकल, उसर, खैरेवाडी, आदिवासीवाडी व इतर वाडयांना शेतीचे सातभारे, पंचनामा, शेतीचे दाखले अशा विविध शेतीसंबंधीची कामे तलाठी कार्यालयात जाऊन करावी लागता; परंतु साई गावाला नेट नसल्याचं ग्रहण लागलेलं असतानाच इमारतीची दुरवस्था या सर्व कारणांमुळे साई परिसरातील जनतेचे प्रचंड प्रमाणात हाल होत आहेत.

विठोबा खंडाप्पा हायस्कूलमध्ये योग दिन उत्साहात साजरा

। पनवेल । प्रतिनिधी ।

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य मंगळवार, दि. २१ जून रोजी पनवेल येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या विठोबा खंडाप्पा विद्यालयात योगासनांची विविध प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. प्राचार्य पी.बी. ठाकूर यांच्या उपस्थितीत सकाळी आठ वाजता कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी एन.सी.सी. ऑफिसर प्रसाद अडसूळे, ज्येष्ठ शिक्षक ए.बी.पाटील उपस्थित होते. श्री. बाविस्कर यांनी योगाचे महत्त्व विशद केले. तसेच अडसूळे आणि वारगुडे यांनी योगाचे विविध प्रकारांचे प्रात्यक्षिक दाखविले. शेवटी उपस्थित मान्यवर व शिक्षक-शिक्षिकांचे आभार श्री. घरत यांनी मानले.

नगरपरिषदेचे सात सफाई कामगार सेवेत कायम

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत नगरपरिषदेमधील आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यात आले आहे, तसे नियुक्तीपत्र त्यांना गुरुवारी देण्यात आले आहे.

■ नियुक्ती पत्र देताना नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, मुख्याधिकारी सुरेखा भणगे आदी. (छायाचित्र : संजय गायकवाड)

कर्जत नगरपरिषद आस्थापनेवर वारसा हक्काने आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून नियुक्त झालेल्या सात कर्मचारी यांना सेवेचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण केल्याने त्यांना सेवेत कायम करण्यात आल्याचे आदेश देण्यात आले आहेत, तसे नियुक्ती पत्र नगराध्यक्ष सुवर्णा जोशी व मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या हस्ते देण्यात आले. याप्रसंगी कार्यालयीन अधीक्षक जितेंद्र गोसावी, आस्थापना विभाग प्रमुख अविनाश पवार, अभियंता मनीष गायकवाड, आरोग्य विभागाचे सुदाम म्हसे, बांधकाम विभागाचे रवींद्र लाड, सभा कामकाज विभाग प्रमुख कल्याणी लोखंडे, कर विभाग रूषिता शिंदे, डी.के. गायकवाड, मुकादम प्रदीप मोरे उपस्थित होते.

कुणाल चव्हाण, नम्रता वाघेला, आकाश परदेशी, केतन गायकवाड, हर्षवर्धन कांबळे, परेश गरुडे, पूजा मोरे या सात जणांना सेवेत कायम करण्यात आले आहे.

डॉ. साहेबराव ओहोळ सेवानिवृत्त

नवीन पनवेल : फुंडे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. साहेबराव ओहोळ हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त २२ जून रोजी त्यांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे पाहुणे माजी प्राचार्य डॉ. बावधनकर, डॉ.जगधनी, डॉ. सोनावले, प्रा. केंगार, डॉ. विलास महाले आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतातून ओहोळ यांनी महाविद्यालयास दिलेल्या योगदानाचा व स्नेहपूर्ण नात्यांची ओळख करून दिली.

चिंचवण शाळेच्या इमारतीस दहा लाखांचा निधी

। उरण । वार्ताहर ।

माजी आमदार विवेक पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रायगड जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून राजपत्रित जिल्हा नियोजन समिती सदस्य माजी सभापती काशिनाथ पाटील यांच्या माध्यमातून रा.जि.प. शाळा चिंचवणच्या नवीन इमारत बांधकामासाठी दहा लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

यावेळी शेकापचे तालुका चिटणीस माजी उपसभापती राजेश केणी, शेकापचे पुरोगामी युवक संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष व देवळोली ग्रामपंचायत सदस्य देवा पाटील, पनवेल पंचायत समितीचे इंजिनिअर मटकर, सांगुर्ली ग्रुप ग्रामपंचायत सरपंच पद्माकर कातकरी, उपसरपंच वसंत पाटील, जमाजी उपसरपंच सचिन खुटले, ज्यांनी या निधीसाठी पाठपुरावा केला ते पुरोगामी युवक संघटनेचे पनवेल तालुका उपाध्यक्ष अमित भोईर, सुकापुर येथील शेकापचे युवा नेते अमित म्हात्रे, चिंचवण पोलीस पाटील दिलीप खुटले, उद्योजक सुनील म्हसकर, मा सदस्य जगदीश पाटील, शेकाप युवा नेते राम पाटील, काशिनाथ भोईर, काशिनाथ खुटले, भाऊ घरत, हरिश्चंद्र पोपेटा, महेश भोईर, परशुराम भोईर, सूरज घरत, दीपक म्हात्रे, मुख्याध्यापक सारिका साळुंखे, उपमुख्याध्यापक मथुरा जाधव, तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा संजीवनी घरत तसेच ग्रामशिक्षण समिती सदस्य महिला, ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.

आज सिडको भवनला घेराव

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यात यावे यासाठी प्रकल्पग्रस्त पुन्हा आग्रही झाले आहेत. दि.बा. पाटील यांच्या ९ व्या स्मृतिदिनी २४ जून रोजी प्रकल्पग्रस्त सिडकोला घेराव घालणार असल्याची माहिती विमानतळ नामकरण सर्व पक्षीय समितीने दिली आहे. गेली दोन वर्षे नामकरणाचा हा वाद सुरू आहे.

या विमानतळाला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा प्रस्ताव नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिफारशीनुसार सिडकोने मंजूर करून शासनाकडे पाठविला आहे. तेव्हापासून हा वाद सुरू झाला आहे. गेल्यावर्षी प्रकल्पग्रस्तांनी याच दिवशी मोठे आंदोलन केले होते. त्यानंतर कोरोना काळात हा लढा शिथिल झाल्याचे बोलले जात असतानाच आता पुन्हा हा आग्रह वाढला आहे.

भरधाव ट्रकची घरांना, दुकानांना धडक

ट्रक चालकाविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

। माणगाव। प्रतिनिधी।

माणगाव तालुक्यातील इंदापूर बाजारपेठेत रस्त्यालगत असणाऱ्या घरांना व दुकानांना भरधाव कंटेनर ट्रकची धडक लागली. हा अपघात दि.२२ जून रोजी रात्री ८.४५ च्या सुमारास घडला. या अपघाताची फिर्याद चिमणलाल भोगिलाल मेहता (७९) रा. इंदापूर, ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिल्यावर अज्ञात कंटेनर ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, यातील फिर्यादी चिमणलाल भोगिलाल मेहता तसेच इतर इसमांच्या घरांना व दुकानांना सर अपघातामध्ये कंटेनर ट्रक क्र. सीजी/०४/एनएम/९२६६ या गाडीवरील अज्ञात चालक याने त्याच्या ताब्यातील कंटेनर ट्रक मुंबई-गोवा महामार्गाने गोवा बाजूकडून मुंबई बाजूकडे चालवीत इंदापूर गावच्या हद्दीत आल्यावर आरोपी अज्ञात चालकाने अतिवेगाने ट्रक चालवून रस्त्यालगत असलेले फिर्यादी व इतर इसमांच्या घरांना व दुकानांना धडक मारून अपघात करून लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल असे कृत्य केले. तसेच तो याबाबतची पोलिसांत काही एक माहिती न देता तेथून पळून गेला. या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करुन ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्री. दोडकुलकर हे करीत आहेत.

हिरवळ एज्युकेशनतर्फे जागतिक मगर दिवस साजरा

। माणगाव । प्रतिनिधी ।

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सिस्कॅप संस्था महाड यांच्यामार्फत शुक्रवार, दि.१७ जून रोजी जागतिक मगर दिवस चांदे क्रीडांगणावर उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाकरिता प्रांत अधिकारी प्रतिमा पुदलवाड-शेंगुलवार, अलिबाग तहसीलदार मीनल दळवी, सीस्कॅप संस्थेचे अध्यक्ष सागर मेस्त्री, गोवा जैवविविधता विभागाच्या उत्कर्षा चव्हाण व इतर मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमांतर्गत गोवा जैवविविधता विभागाच्या उत्कर्षा चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना महाड परिसरात आढळून येणाऱ्या मगर प्रजाती व त्यांच्या राहणीमान यावर मार्गदर्शन केले, तसेच सीस्कॅप संस्थेचे अध्यक्ष सागर मेस्त्री यांनी विद्यार्थ्यांनी लुप्त होणाऱ्या मगर प्रजातीचे संवर्धन व संरक्षण याबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रमुख अतिथी प्रांत अधिकारी प्रतिमा पुदलवाड- शेंगुलवार यांनी मगर तसेच लुप्त होत आलेल्या इतर प्राणी प्रजातींचे संवर्धन करणे पुढील पिढीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे, असे मत मांडले. त्यानंतर विद्यार्थ्यांना जिवंत मगर व त्यांचे वास्तव्य असलेल्या ठिकाणी नेऊन मार्गदर्शन करण्यात आले.

हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोर धारिया, संचालिका सोनाली धारिया, प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी, प्राचार्य सुदेश कदम यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनात असणाऱ्या विविध प्रश्नांची उत्तरे मान्यवरांकडून जाणून घेतली.

सायकलींच्या वाटपातून शिक्षणाला 'दिलासा'

१५ आदिवासी मुलींना सायकलींचे वाटप

। नवीन पनवेल। वार्ताहर।

दिलासा फाऊंडेशन, पनवेलतर्फे पनवेल तालुक्यातील केवाळे येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शाळेतील आदिवासी मुलींना १५ सायकलींचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहर सचदेव, सचिव मयूर तांबडे, सहसचिव बाळाराम रोडपालकर, सदस्य ऍड. नागेश हिरवे, मुख्याध्यापक लहू तातरे, एकनाथ फडके, सुभाष चौधरी, शाळेचे चेअरमन मीलन पालकर, भारत पालकर, केशव माळी, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

गरजू नागरिकांना सायकल मिळावी, यासाठी दिलासा फाऊंडेशनने नागरिकांना आवाहन केले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला आणि १५ सायकली जमा झाल्या. या १५ सायकलींचे वाटप केवाळे येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत करण्यात आले. मुख्याध्यापक लहू तातरे यांनी दिलासा फाऊंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक केले व दिलासा फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी चांगला उपक्रम राबवला असल्याचे आवर्जून नमूद केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहर सचदेव, उपाध्यक्ष डॉ. कृष्णा देसाई, सचिव मयूर तांबडे, सहसचिव बाळाराम रोडपालकर, खजिनदार विशाल सावंत, सदस्य ॲड. नागेश हिरवे, हरेश साठे, रोहन गावंड, दीपक जगे, वसंत जाधव, राज भंडारी यांनी विशेष मेहनत घेतली.

यापुढे देखील गरजू नागरिकांना सायकली वाटप करण्यात येणार आहेत, ज्यांना या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे आणि गरजूंना मदत करावयाची आहे, त्यांनी ॲड. मनोहर सचदेव ७२७६६६६६६६, मयुर तांबडे ९३२३९३५०५०, डॉ. कृष्णा देसाई ९३७२६३५४४३, विशाल सावंत यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ साईश्रध्दा फाऊंडेशनच्या वावे व बांधण येथील शाळेसाठी शिक्षिका पाहिजे. तसेच बांधण येथील शाळेसाठी अकाऊंट कम क्लार्क पाहिजे. बायोडाटा वॉटस्अॅप करा. ८३९०९०९४७०

■ 1BHK फ्लॅट विकणे आहे. बे वुड्स- २ गोंधळपाडा, अलिबाग. संपर्क- ९९२०२७१८५५.

■ URGENTLY REQUIRED : telephone operator for internet service office minimum qualification 12th with atleast basic computer knowledge.Office address: shivraj internet service CONTACT: 8575552288 / 9372151199

■ Urgently Requited-Xerox च्या दुकानामध्ये मराठी व इंग्लिश टायपिंगसाठी मुलगी हवी आहे, टायपिंग स्पीड ४०. संपर्क- ९७३०९४९४०४

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

जाहीर सूचना

सर्व हितसंबंधित व्यक्तींना कळविण्यात येते की, राष्ट्रीय महामार्ग क्र.६६चे रूंदीकरण करण्यासाठी महाड तालुक्यातील मौजे दासगाव, गांधारपाले व कसबे महाड या गावातील जमिनी संपादीत होत आहेत. त्याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३A अधिसूचना हिंदी व इंग्रजी मध्ये भारत राजपत्रात दिनांक १५/०६/२०२२ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. या अधिसूचनेवर हरकती असल्यास अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी महाड विभाग महाड यांचे कार्यालयात दाखल कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

स्थळ : महाड
दिनांक : २०/०६/२०२२

सही/-
(प्रतिमा पुदलवाड-शेंगुलवार)
सक्षम प्राधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी
महाड उपविभाग महाड

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99
REGD. No. D. L.-33004/99

भारत का राजपत्र
The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-15062022-236599
CG-DL-E-15062022-236599

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 2607] नई दिल्ली, बुधवार, जून 15, 2022/ज्येष्ठ 25, 1944
No. 2607] NEW DELHI, WEDNESDAY, JUNE 15, 2022/JYAISHTHA 25, 1944

सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय

अधिसूचना

नई दिल्ली, 15 जून, 2022

का.आ. 2739(अ).—केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH66 के कि.मी. 108.4 से कि.मी.148 (महद) तक के भू-खण्ड के निर्माण (चौड़ीकरण/पेव्ड शोल्डर सहित 2-लेन/4-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है ।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (1) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा ।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात् महद AND पोलादपुर को लिखित रूप में प्रस्तुत की जाएगी और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा ।

उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा ।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है ।

अनुसूची

महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH66 के कि.मी. 108.4 से कि.मी.148 (महद) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण

राज्य का नाम: महाराष्ट्र		जिले का नाम: रायगड			
क्रमिक संख्या	**सर्वेक्षण संख्या**	**भूमि का प्रकार**	**भूमि की प्रकृति**	**भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई)**	**भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर)**
तालुक का नाम: महाड					
गांव का नाम: दासगाव					
1	41/2B	निजी	नम	0.0920000(हेक्टेयर)	0.0920000
गांव का नाम: गांधारपाले					
1	104A/1C/3	निजी	शुष्क	0.0170000(हेक्टेयर)	0.0170000
गांव का नाम: कसबे महाड					
1	32/1B	निजी	नम	0.0135000(हेक्टेयर)	0.0135000
			कुल	**0.1225**	**0.1225**

[फा. सं. RW/NH-37014/21/2013-NHDP-IV A/3A]

राजेश गुप्ता, निदेशक

MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS

NOTIFICATION

New Delhi, the 15th June, 2022

S.O. 2739(E). In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for building (widening/two lane with paved shoulder/four laning etc.,), maintenance, management and operation of NH66 in the stretch of land from Km 108.4 to Km148 (SDO office Mahad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, object to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, SUB DIVISIONAL OFFICER MAHAD AND POLADPUR in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

SCHEDULE

Brief Description of the land to be acquired with or without structures falling NH66 in the stretch of land from Km 108.4 to Km148 (SDO office Mahad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA

State: MAHARASHTRA		District: RAIGAD			
S. No.	**Survey / Plot Number**	**Type of Land**	**Nature Of Land**	**Area (in Local Unit)**	**Area (in Hectare)**
Taluk: Mahad					
Village: Dasgaon					
1	41/2B	Private	Wet	0.0920000(Hectare)	0.0920000
Village: Gandharpale					
1	104A/1C/3	Private	Dry	0.0170000(Hectare)	0.0170000
Village: Kasabe Mahad					
1	32/1B	Private	Wet	0.0135000(Hectare)	0.0135000
			Total	0.1225	0.1225

[F. No. RW/NH-37014/21/2013-NHDP-IV A/3A]

RAJESH GUPTA, Director

क्र.जिमाका/राअ/जाहि./६३/२०२२-२३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-बामणसुरे, ता.अलिबाग, येथील गट नंबर १०३, एकूण क्षेत्र ०-४४-८० हे.आर., आकार १०.८७ रू.पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२२-४० हे.आर., आकार ५.४४ रू.पैसे पैकी सुषमा सदानंद काठे रा.गवळी चाळ, रूम नं. २०१, शिवप्रसाद हॉटेल समोर, राम मारूती रोड, ठाणे, ता.जि.ठाणे यांचे सामाईकातील अविभक्त हिश्याचे क्षेत्र ही मिळकत विद्यमान मालकांकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २३/०६/२०२२

(ॲड.संजय द.म्हात्रे)
सितास्मुती, आगरसुरे, पो.चोंढी
ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर सावधान नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१.मौजे कोळगाव, ता.अलिबाग, येथील गट नं.९४/१, या मिळकतीचे खरेदीविक्री व्यवहाराबाबत जाहीर पेपर नोटीस दिनांक १५/०६/२०२२ रोजीचे 'दैनिक रत्नागिरी टाईम्स' रायगड आवृत्ती' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली आहे. सदर विक्री व्यवहारास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे.

२. सदरहू गट नं. ९४/अ (सध्याचा गट नं.९४/१) पैकी ०-१०-०० हे.आर. (दहा गुंठे) क्षेत्रफळ असलेली मिळकत आमचे अशिलांनी त्या मिळकतीचे पुर्वगामी मालक श्री.पांडूरंग नागु म्हात्रे यांचेकडून दिनांक १८/०८/२००१ रोजीचे दस्ताने खरेदी केलेली होती व आहे. सदर विक्री व्यवहारापोटी संपुर्ण मोबदला रक्कम आमचे अशिलांनी श्री.पांडूरंग नागु म्हात्रे यांस अदा केलेली असून सदरहू मिळकतीचा ताबा आमचे अशिलांनी दिनांक १८/०८/२००१ रोजी श्री.पांडूरंग नागु म्हात्रे यांचेकडून साक्षीदारांसमक्ष प्रत्यक्ष जागेवर जावून घेतलेला होता व आहे. आमचे अशिलांनी सदर मिळकत ताब्यात घेतलेली असून तेथे आजतागायत आमचे अशिलांची वहिवाट आहे.

३.सदर गट नं.९४/१ या मिळकतीचे प्रत्यक्ष जागेवर वाटप होवून हिस्से अद्याप स्वतंत्र झालेले नाहीत. सदर गट नं.९४/१ मध्ये आमचे अशिलांस ०-१०-०० हे.आर.पुरता खरेदी केलेला हिस्सा आहे. अशी वस्तुस्थिती असल्याने गट नं.९४/१ बाबत प्रत्यक्ष जागेवर वाटप होवून हिस्से स्वतंत्र होईपर्यंत मौजे कोळगाव गट नं.९४/१ पैकी कोणत्याही भागाचे विक्री व्यवहारास आमचे अशिलांची कडक हरकत आहे.

४. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये. त्यास आमचे अशिलांची कडक हरकत आहे. याउपरही आमचे अशिलांची हरकत डावलून बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करून जर कोणी वर नमुद केलेल्या मिळकती संदर्भात विक्री अथवा तत्सम प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याबाबत अलहिदा संबंधीतांवर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कायदेशीर कोर्ट कारवाई करण्यात येईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :२२/०६/२०२२

सही/-
ॲड.सचिन सदानंद पाटील
रा.कुरूळ ता.अलिबाग जि.रायगड
ऑफीस : ऋग्वेदा अपार्टमेंट, श्रीबाग नं.३,
ता.अलिबाग जि.रायगड
फोन नं. :९८८१६३७९२४/८८८८६७६५०

जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे सहाण, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री.शेखर एस.वेंगसकर उर्फ शेखर एस.वेंगसरकर रा.माहिम, मुंबई यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	एकूण क्षेत्र आर चौ.मी	आकार रू.पैसे
सहाण, ता.अलिबाग जि.रायगड	२९९/४२	२-८२-०	२८-२०

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.२३.०६.२०२२

ॲड.मच्छिंद्र एस.म्हात्रे
बी/७, सोमेश्वर वैभव बिल्डींग,
ब्राम्हण आळी, अलिबाग,
मो.नं. ९८९००७९३०२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील नमूद केलेल्या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. राजेश कृष्णा पाटील, २. श्री. नरेश कृष्णा पाटील, ३. मंगला कृष्णा पाटील, ४. अनिता कृष्णा पाटील यांच्याकडून माझे अशिलांनी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

जमीन मिळकतीचे वर्णन

मौजे	पूर्वीचा मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
केतकीचा मळा ता. अलिबाग जि. रायगड	पेढांबे, गट नं. २५१ (जुना सर्व्हे नं. २२/५)	४७	पो.ख. २-००-००	०-००

वर नमूद केलेली जमीन मिळकत ही या नोटीसचा विषय आहे.

तरी वरील जमीन मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील जमीन मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहेत, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करुन माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २३/०६/२०२२

सही/-
ॲड. संतोष स. पवार
'श्रृतीसारंग'युनियन बँकेसमोर
ब्राह्मण आळी, अलिबाग-रायगड
फोन नं. ९८८१४१३९०१

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल १)श्री.सुरेश गणपत वाजे २) श्रीमती कृष्णाबाई गणपत वाजे ३) श्रीमती शांती शांताराम महागांवकर ४) रतन उर्फ सुरेखा रमण महाडिक वरील सर्व रा.मु.बारशीव, पो.बोर्लीमांडला, ता.मुरूड, जि.रायगड यांच्याकडून श्री.अंशुल तुलसी भिमजयानी, रा.ॲशफोर्ड अपार्टमेंट, फ्लॅट नं.१, पहिला मजला, सह्याद्री गेस्ट हाऊस जवळ, रिल रोड, मलबार हिल, मुंबई यांनी खालील वर्णनाच्या मिळकतीचे रजिस्टर अखत्यारपत्र म.र.र.दस्त क्र.३०८/२०१८ दि.२१/०५/२०१८ रोजी अखत्यारपत्र घेतले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
बारशीव	१४६/१	०.३३.००	०.२६

वरील मिळकतीचे श्री.अंशुल तुलसी भिमजयानी यांना दिलेले अखत्यारपत्र जमिनीचे विद्यमान मालक १) श्री.सुरेश गणपत वाजे २) श्रीमती कृष्णाबाई गणपत वाजे ३) श्रीमती शांती शांताराम महागांवकर ४) रतन उर्फ सुरेखा रमण महाडिक हे या जाहीर नोटीसीद्वारे दिलेले नोंदणीकृत अखत्यारपत्र कायमचे रद्द करीत आहेत. सदर कोणी सदर अखत्यारपत्राचा वापर करून सदर वरील मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करीत असेल अथवा केला असेल तर तो आमचे अशिल १) श्री.सुरेश गणपत वाजे २) श्रीमती कृष्णाबाई गणपत वाजे ३) श्रीमती शांती शांताराम महागांवकर ४) रतन उर्फ सुरेखा रमण महाडिक यांच्यावर बंधनकारक राहणार नाही हे या जाहीर नोटीसीद्वारे जाहीर करीत आहे.

दि.२३/०६/२०२२

ॲड.राकेश नारायण पाटील
रा.आगरी पॅलेस, मु.पो.चिंचोटी,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.९२७२६२०००५

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, श्री.संतोष रामचंद्र माटे, श्री.संदेश रामचंद्र माटे दोघेही रा.मु.बारशीव, पो.बोर्लीमांडला, ता.मुरूड, जि.रायगड ३) श्रीमती ललिता रामचंद्र माटे रा.मु.सर्वे, पो.काशिद, ता.मुरूड, जि.रायगड ४) श्रीमती जयश्री अरूण महाडिक ५) श्रीमती संगिता रामचंद्र माटे वरील ४ ते ५ सर्व रा.मु.बारशीव, पो.बोर्लीमांडला, ता.मुरूड, जि.रायगड यांच्याकडून श्री.जगन्नाथ रघुनाथ पुरो रा.मु.पो.सासवणे, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी खालील वर्णनाच्या मिळकतीचे रजिस्टर अखत्यारपत्र म.र.र.दस्त क्र.८१८/२००६ दि.१५/६/२००६ रोजी अखत्यारपत्र घेतले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
बारशीव	१४१	०.१७.०१	०.२३

वरील मिळकतीचे श्री.जगन्नाथ पुरो यांना दिलेले अखत्यारपत्र जमिनीचे विद्यमान मालक १) श्री.संतोष रामचंद्र माटे २) श्री.संदेश रामचंद्र माटे ३)श्रीमती ललिता रामचंद्र माटे ४) श्रीमती जयश्री अरूण महाडिक ५) श्रीमती संगिता रामचंद्र माटे हे या जाहीर नोटीसीद्वारे दिलेले नोंदणीकृत अखत्यारपत्र कायमचे रद्द करीत आहेत. सदर कोणी सदर अखत्यारपत्राचा वापर करून सदर वरील मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करीत असेल अथवा केला असेल तर तो आमचे अशिल १) श्री.संतोष रामचंद्र माटे २) श्री.संदेश रामचंद्र माटे ३)श्रीमती ललिता रामचंद्र माटे ४) श्रीमती जयश्री अरूण महाडिक ५) श्रीमती संगिता रामचंद्र माटे यांच्यावर बंधनकारक राहणार नाही हे या जाहीर नोटीसीद्वारे जाहीर करीत आहे.

दि.२३/०६/२०२२

ॲड.राकेश नारायण पाटील
रा.आगरी पॅलेस, मु.पो.चिंचोटी,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.९२७२६२०००५

खवय्यांसाठी खेकडे बाजारात दाखल

। माथेरान । वार्ताहर ।

पावसाळा सुरू होताच माथेरानच्या बाजारात काळ्या खेकड्या, चिंबोरी, मुठ्या विक्रीसाठी दाखल झाली असून यांच्यासाठी खवय्यांकडून चांगलीच मागणी वाढत आहे. माथेरानच्या बाजारात खेकड्या, मुठ्या विक्रीसाठी येताच खरेदीसाठी एकाच गर्दी होताना दिसत आहे.

आत्ता सध्या समुद्रातील मासेमारी बंद झाल्यामुळे नागरिकांनी मटण, चिकन यावर ताव मारण्यास सुरवात केली आहे. त्यामुळे त्यांचे भावही वधारले आहेत. काही दिवसांपासून पावसाला सुरवात झाली असल्याने काही ठिकाणी खेकडे, मुठ्या हे खवय्यांना आकर्षित करीत आहेत. फक्त पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मिळणाऱ्या पौष्टिक आणि चविष्ट मुठ्यांना मागणी वाढत आहे. येथील बाजारात मुठ्या आणि काळ्या खेकड्या येथे आदिवासी बांधव डोंगर दऱ्यातून घेऊन येतात. कोवळ्या गवतावर हे आपली गुजराण करणाऱ्या मुठ्या बाजारात दाखल होताच येथील नागरिक खवय्ये तुटून पडतात. माथेरानमधील काही डोंगरदरीमध्ये मिळणाऱ्या काळ्या चिंबोऱ्या यांच्यासाठी देखील खवय्यांची मोठी गर्दी होताना दिसत

आहे. विशेषतः रात्रीच्यावेळी हे खेकडे, रिमझिम पावसात बाहेर पडतात.डोंगरदरी, पाण्याची ओहळ यामध्ये या काळ्या चिंबोऱ्या सापडतात.आणि बाजारात सध्या यांची मागणी चांगलीच वाढत आहे.सध्या २५० ते ३०० रुपयांना यांच्या एक वाटा मिळत आहे.

असे पकडतात खेकडे

रात्रीच्यावेळी रिमझिम पाऊस सुरू झाल्यावर खवय्ये आपल्या हातात गॅसबत्ती किंवा टॉर्च, बॅटरी घेऊन घाट रस्त्याला किंवा पाण्याच्या ओहळात यांना पकडण्यासाठी जातात. बत्ती किंवा बॅटरीच्या उजेडात मुठे जागीच थांबतात. सोबत एखादे गोणपाट घेऊन जावे लागते म्हणजे यामध्ये भरून खेकडे, आणले जातात.

या एका वाट्यात पाच चिंबोऱ्या असतात. आदिवासी लोक बाजारात यांचे वाटे घेऊन येताच खवय्यांची एकच झुंबड उडते.

वाढत्या महागाईने बाप्पाही त्रस्त

। पेण । संतोष पाटील ।

महागाईची झळ सर्वसामान्यांसह देवादिकांनाही बसू लागली आहे. तोंडावर आलेला गणेशोत्सवही त्यास अपवाद ठरलेला नाही. बाप्पाच्या किमतीत सरासरी ३० टक्के वाढ होण्याची अपेक्षा गणेशमूर्तीकारांकडून व्यक्त केली जात आहे. याचा फटका गणेशभक्तांना बसणार आहे.

गणेशाचे माहेरघर म्हणून पेणची संपूर्ण जगात ओळख आहे. राज्यामध्ये मागच्या दोन वर्षांत कोरोना, निसर्ग चक्रीवादळ, तोक्ते वादळ यासारखी अनेक संकटे आली. या संकटांना तोंड देत येथील गणेश मूर्तीकार आजही उभे आहेत. एकीकडे सरकारने घातलेल्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या निर्बंधांमुळे कारखानदार माती कामाकडे मोठ्या प्रमाणात झुकलेला दिसतो. मात्र, प्लास्टर ऑफ पॅरिस आणि माती या दोघांच्या किमतीचा विचार करता मोठी तफावत आढळून येत आहे. त्यातच माती काम करण्यासाठी वेळ आणि पैसा हे दोन्हीही प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीपेक्षा जास्त जात आहेत.

यंदाही गणपतीची माती, रंग आणि रोजंदारी वाढली असल्याने कळत-नकळत त्याचा प्रभाव बाप्पाच्या मूर्तीवर पडला असून, साधारणतः २५ ते ३० टक्क्यांनी बाप्पाच्या मूर्तीच्या किमतीमध्ये फरक पडला आहे.

> **गणेशमूर्तीच्या किमतीत वाढ केली नाही तर गणपती कारखानदारांना आर्थिक तोटा सहन करावा लागेल. माती, पीओपी, रंग यांच्या किमतीबरोबर विजेचा जो लपंडाव सुरू आहे, त्यामुळे जनरेटरसाठी जास्तीचे पैसे मोजावे लागतात. या सर्व बाबींचा सारासार विचार केला तर, ज्या काही किमतीत वाढ झालेली आहे, त्या नाममात्र आहेत.**
> **– दिलीप लाड, विद्या कला केंद्र, पेण**

अशी आहे दरवाढ

गणेशमूर्ती बनवण्यासाठी लागणारी शाडू माती गेल्या वर्षी १४० रूपये होती, तीच आता १५० रूपयांनी मिळत आहे. लाल माती गेल्या वर्षी २४० यंदा २८० रूपये, प्लास्टर ऑफ पॅरिस गेल्या वर्षी १२० रूपये यंदा १६० रूपये, रंगपिशवी १३० रूपयांऐवजी २१० रूपयांनी मिळत आहे. यामध्ये सरासरी १० ते १५ टक्के वाढ झाली आहे. कामगारांच्या रोजंदारीमध्येही २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. कारखान्यात कामगार ५०० रूपयांपासून १ हजार रूपयांपर्यंत कामानुसार मजुरी आकारली जात आहे. यामध्ये गणेशाची डोळे आखणी, स्प्रे पेंटिंग, पेटिंग यात कामगारांना ८०० ते हजार रूपयांपर्यंत पगार मुजरी द्यावी लागते. तर मातीकाम, पॉलिस यासाठी ४०० ते ६०० पर्यंत मजुरी लागत आहे. कारखान्यांमध्ये बऱ्याच अंशी पीओपीच्या मूर्ती तयार होतात. माती कामासाठी आणि पीओपीसाठी एक वेगळी मेहनत घ्यावी लागते. तसेच या दोन्ही कामांसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या मजुरांचा उपयोग केला जातो. एकंदरीत, गेल्या वर्षीपेक्षा यंदा खर्च पाहता गणपती मूर्तींच्या किंमतीत वाढ झालेली गणेशभक्तांना पहायला मिळेल, यात काही शंकाच नाही. मात्र, एक गोष्ट निश्चित प्लास्टर ऑफ पॅरिसपेक्षा शाडू मातीच्या व लाल मातींच्या मूर्तीच्या किंमती वाढूनदेखील गणेशभक्तांची मागणी जास्त असल्याचे गणपती कारखानदारांचे म्हणणे आहे. गणपती कारखानदारी हा असा व्यवसाय आहे की, त्या व्यवसायाला पूर्णतः आर्थिक भांडवल हे अगोदर जोडावे लागते. त्यामुळे गणपती कारखानदारांना पहिल्यांदा पैशाची तरतूद करावी लागते. त्यातच यंदा माती, पीओपी, रंग तसेच कारागीरांच्या मजुरी यामध्ये वाढ झाल्याने कळत-नकळत गणपती मूर्तींच्या किंमतीमध्येदेखील वाढ करावी लागली आहे, असे मूर्तीकारांचे म्हणणे आहे.

२५ लाख बाप्पांची निर्मिती

गणेशोत्सव दोन महिन्यांवर असल्याने पेणमधील कारखान्यांत गणेशमूर्ती बनवण्याची लगबग जोरात सुरू आहे. तालुक्यात १५०० च्या आसपास असणाऱ्या कारखान्यांमध्ये साधारणतः २० ते २५ लाख गणेशमूर्ती निर्माण केल्या जातात. मात्र, माती रंग आणि रोजंदारी वाढल्यामुळे गणपती कारखानदार आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. कारण या धंद्यामध्ये पूर्णतः आर्थिक भांडवल अगोदर जोडावे लागते.

महत्त्वाचे

ऋतुजा पाटीलला दहावीत ८७.३५ टक्के

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील सर्वोदय विद्यालय सुडकोली हायस्कूलची विद्यार्थिनी ऋतुजा हरिदास पाटील हिने दहावीच्या परीक्षेत ८७.३५ टक्के गुण संपादन करीत द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. तसेच सानेगाव-यशवंतखार या संस्थेतूनसुद्धा ती द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. तिच्या या यशाबद्दल कुदे येथील रमेश पाटील यांच्यासह सर्व स्तरातून तिचे कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

मृतदेह आढळला

। पनवेल । वार्ताहर ।

टाटा पॉवर लायटीच्या टॉवर जवळ एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून सदर करंजाडे ते भिंगारी जाणाऱ्या रस्त्यावर घडली आहे. या इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, रंग सावळा, उंची ५ फूट ५ इंच, चेहरा उभट, अंगाने मध्यम, डोक्यावरील केस काळे व मध्यम वाढलेले असून, अंगात पिवळ्या व राखाडी आडवे पट्टे असलेला हाफ बाह्याचा टीशर्ट व फिकट राखाडी पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा सहा. पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे यांच्याशी संपर्क साधावा.

इन्स्टा क्लिक..

आकर्षक निळसर चिंतामणी रंगाचा हा स्थानिक पक्षी आहे. आकार लहान असून, हिरवट-निळ्या रंगाचे पंख असलेला हा पक्षी उपनगरांमधून व भोवतालच्या परिसरात झुडुपांवर आणि विजेच्या तारांवरही बसलेला दिसून येतो. पिवळसर तपकिरी रंगाचे पोट, काळी लांब चिमट्यासारखी चोच, असे वैशिष्ट्ये असणारा हा पक्षी आहे. (छायाचित्र : श्रेयस पाटील)

अल्पवयीन मुलाला धारदार शस्त्राने वार करून लुटले

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल रेल्वे स्थानकात बसलेल्या एका अल्पवयीन मुलावर धारदार शस्त्राने वार करून लुटल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, रेल्वे पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

माथेरान येथे राहणारा शंकर पाटील (१६) हा भाऊ दशरथ पाटील (२०) याच्यासोबत पनवेलमध्ये आला होता. त्यानंतर दशरथ हा घोडा खरेदीचा व्यवहार करण्यासाठी नेरुळला गेला असता, शंकर रेल्वे स्थानकातच त्याची वाट पाहात बसलेला होता. शंकर हा शर्यतीचे घोडे चालविण्याचे काम करत असून, खरेदी केलेला नवीन घोडा तो घेऊन जाणार होता, परंतु तो स्थानकात बसून असतानाच, तिथे आलेल्या दोन तरुणांनी त्याच्याकडील बॅग व मोबाइल हिसकावण्याचा प्रयत्न केला. शंकर याने त्यांना प्रतिकार केला असता, दोघांपैकी एकाने त्याच्याकडील धारदार शस्त्राने त्याच्यावर वार करून मोबाइल व बॅग लुटून पळ काढला. हे दोघेही स्थानकातून सुटलेल्या लोकलमध्ये चढून दुसऱ्या बाजूला उतरून पळाले.

वाहतूक कोंडी फोडण्यासाठी वाहनांना प्रवेशबंदी

। पनवेल । वार्ताहर ।

खारघर वसाहत आणि कोपरा गावाला जोडणाऱ्या उड्डाणपुलाखालील वाहतूककोंडीफोडण्यासाठीपुलाखालून जाणाऱ्या वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे.

हिरानंदानी पुलापासून काही अंतरावर असलेल्या कोपरा पुलाखालून खारघर से. १८ मध्ये जाणाऱ्या व खारघर सेक्टर १८ मधून कोपरा गाव व पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या वाहतुकीमुळे या ठिकाणी नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. काही कारणांमुळे सायन-पनवेल मार्गावरील कोपरा पुलावरील वाहतूक बंद पडल्यास खालून जाणाऱ्या वाहतुकीत वाढ होऊन पनवेलकडे जाणारी वाहतूक ठप्प होण्याची शक्यता आहे. तसेच आणीबाणीच्या वेळी रुग्णवाहिका, अग्निशमन दल यासारख्या अत्यावश्यक सेवा देणाऱ्या वाहनांना याचा अडथळा निर्माण होण्याची शक्यता असल्याने नवी मुंबई वाहतूक नियंत्रण विभागाने खारघरकडून कोपरा पुलाजवळ खाली उतरणाऱ्या रस्त्यावर कायमस्वरूपी वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

वाहतूक नियंत्रण विभागाने या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहन चालकांसाठी पर्यायी मार्ग ठेवला आहे. त्यानुसार डी-मार्ट सेक्टर १८ कडून कोपरा गाव येथे जाण्यासाठी कोपरा पुलाजवळील सर्व्हिस लेनवरून कळंबोली सर्कल तेथून यूटर्न घेऊन कोपरा गाव येथे जाण्यासाठी रस्ता ठेवण्यात आला आहे. तसेच खारघर सेक्टर १८ येथील रहिवाशांना पुण्याकडे जाताना वरीलप्रमाणेच कोपरा पुलाजवळून खाली उतरून जाण्याचा पर्याय ठेवण्यात आला आहे. तर, मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांसाठी बँक ऑफ इंडिया चौकातून हिरानंदानी पुलाखालून जाण्याचा पर्यायी मार्ग ठेवण्यात आला आहे. सर्व प्रकारच्या वाहनांसाठी नो एण्ट्री असल्याची अधिसूचना नवी मुंबई वाहतूक नियंत्रण विभागाचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांनी मंगळवारी काढली.

बालग्रामधील मुलांना मदत

शैक्षणिक साहित्यासह छत्री, अन्नधान्याचे वाटप

। पनवेल । वार्ताहर ।

ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या बालग्राम प्रकल्पातील बालकांना वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल यासह इतर शैक्षणिक साहित्य, अन्नधान्य व छत्री वाटप करण्यात आले.

समाजाने नाकारलेल्या अनाथ, वंचित, उपेक्षित, निराधार आणि असाध्य आजाराने ग्रासलेल्या पालकांच्या गरजू बालकांचे पालकत्व स्वीकारून बालहक्क कायद्यातील नियमांच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित अशा बालकांना सामाजिक सुरक्षितता प्रदान करीत त्यांचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा उंचावण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी ग्रामसंवर्धनचे अध्यक्ष संतोष ठाकूर, एकता सामाजिक संस्था कामोठेचे अध्यक्ष अमोल शितोळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष गव्हाळे, श्रेयश ठोकळ, ग्राम संवर्धनचे राजेश रसाळ, सौ. मानसी पाटील, शैलेश कोंडस्कर, जयेश शिंदे, सचिन पाटील, अब्रार मुल्ला आदी बालग्राम मित्र उपस्थित होते. मागील दोन वर्षांपासून बालग्राम च्या बालकांना कोकण कट्टा विलेपार्ले ही संस्था धान्याची मदत करीत आहे, तर चालू वर्षी एकता सामाजिक संस्था कामोठेने छत्र्या देऊन मदत केली आहे. त्याप्रमाणे समाजातील इतर दानशूर व्यक्तींनीही पुढे येऊन बालग्राम प्रकल्पास सहकार्य करण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी केले आहे.

योग दिन उत्साहात

। कुसुंबळे । वार्ताहर ।

तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाऊंडेशन अलिबाग, प्राथमिक शाळा कुसुंबळे आदिवासीवाडी तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प अलिबाग अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या नवीन वाघविरा व कुसुंबळे आदिवासीवाडी अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी तेजस्विनी फाऊंडेशन अध्यक्षा जीविता पाटील, राजिप प्राथमिक शाळा कुसुंबळे आदिवासीवाडी मुख्याध्यापिका मंदाकिनी पाटील, उपमुख्याध्यापक सुनील पाटील, तेजस्विनी फाऊंडेशन पदाधिकारी व मार्गदर्शक देवेंद्र केळुस्कर, अंगणवाडी सेविका नयना पाटील, अंगणवाडी मदतनीस लीला पाटील, ग्रामस्थ नीता पाटील तसेच मोठ्या संख्येने मुले व ग्रामस्थ उपस्थित होते.

पनवेलमधील ३२ इमारती धोकादायक

। पनवेल । वार्ताहर ।

पावसाळा सुरू झाला आहे. पावसाळ्यात धोकादायक इमारती कोसळण्याच्या घटना घडत असतात. यामुळे या अशा धोकादायक इमारतीत राहणाऱ्या नागरिकांचा जीव धोक्यात येत असतो. अनेक ठिकाणी या धोकादायक इमारतीत राहणाऱ्या नागरिकांना आपला जीव धोक्यात घालावा लागतो. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात एकूण ३२ धोकादायक इमारती पालिकेने घोषित केल्या आहेत. यापैकी काही इमारतीत आजही रहिवासी वास्तव्यास आहेत. यामगाची काही तांत्रिक कारणेदेखील आहेत. घर सोडले तर राहायचे कुठे? भाडोत्री घराचे भाडे भरणार कसे, असे असंख्य प्रश्न या रहिवाशांना सतावत आहेत.

पालिका क्षेत्रात ३२ इमारती पालिकेने धोकादायक घोषित केल्या आहेत. संबंधित इमारतीचे पाणी आणि वीज कनेक्शन तोडण्याच्या सूचना पालिकेने संबंधित विभागाला दिल्या आहेत. पालिका क्षेत्रात या धोकादायक इमारतीत शेकडो रहिवासी वास्तव्यास आहेत. यामुळे या रहिवाशांचा जीव टांगणीला लागून राहिला आहे. विशेष म्हणजे, यामध्ये अबालवृद्धांचा समावेश आहे. पालिकेने संबंधित धोकादायक इमारतींना नोटिसा बजावल्या आहेत. याव्यतिरिक्त सिडकोच्या क्षेत्रातील शेकडो इमारतींचादेखील समावेश यामध्ये आहे. मात्र, दुर्घटना घडली तर जबाबदार कोण? असा प्रश्नदेखील निर्माण झाला आहे.

> **पालिकेने धोकादायक इमारतींसंदर्भात स्थापन केलेल्या कमिटीच्या सर्व्हेनुसार धोकादायक ३२ इमारतींना नोटिसा बजावल्या आहेत.**
> **– कैलास गावडे, उपायुक्त, पनवेल महानगरपालिका**

संबंधित इमारतींचे पाणी आणि वीज कनेक्शन तोडण्याच्या सूचना पालिकेने संबंधित विभागाला दिल्या आहेत. पालिका क्षेत्रात या धोकादायक इमारतीत शेकडो रहिवासी वास्तव्यास आहेत.

शेकडो रहिवाशांचा जीव टांगणीला

महापालिकेने बजावल्या नोटीसा

अलिबागेत योग दिन उत्साहात

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड आणि श्री अंबिका योग कुटीर, ठाणे शाखा अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस.एस. सावंत यांनी मार्गदर्शन करीत जीवनातील योगाचे महत्त्व विशद केले. श्री अंबिका योग कुटीर, ठाणे शाखा अलिबागचे योग प्रशिक्षक कुमार जोगळेकर, सिमरन राऊत, जयंत वाखाले यांनी सर्वांना योग प्रशिक्षण दिले. यावेळी विविध प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले.

यावेळी जिल्हा सरकारी वकील ॲड. भूषण साळवी, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रवीण ठाकूर यांच्यासह सर्व न्यायाधीश, वकील, न्यायालय कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव अमोल शिंदे यांनी केले.

सेंट्रल रेल्वेच्या स्टेशन कन्सलटेटिव्ह कमिटीची बैठक

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल रेल्वे स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सेवा सुविधा सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने स्थापन करण्यात आलेल्या स्टेशन युजर्स कन्सलटेटिव्ह कमिटीची बैठक सेंट्रल रेल्वेच्या डीसीएम यांच्यासोबत बुधवार, दि. २२ जून रोजी पार पडली. कमिटीच्या सदस्यांनी प्रवाशांना उद्भवणाऱ्या अडचणी आणि समितीच्या सूचना असणारे निवेदन दिले. यातील अत्यंत जरुरीचे मुद्दे विचारात घेऊन लवकरात लवकर त्या समस्या सोडविण्याचे आश्वासन डीसीएम यांनी दिले.

सेंट्रल रेल्वेचे डीव्हीजीनल कमर्शिअल मॅनेजर एम.एल. मीना यांनी स्टेशन युजर्स कन्सलटेटिव्ह कमिटीच्या सदस्यांनी मांडलेल्या समस्या ऐकून घेतल्या. तसेच आगामी काळात होणाऱ्या विकास प्रकल्पाबाबत सदस्यांना अवगत केले. समितीचे उपाध्यक्ष यशवंत ठाकरे यांनी प्रास्ताविक सादर केले. जनरल सेक्रेटरी श्रीकांत बापट, सहाय्यक सेक्रेटरी निलेश जोशी, रमेश जानोरकर, डॉ. मधुकर आपटे, पत्रकार मंदार दोंदे, विलास दातार, सरिता पाटणकर यांनी प्रवाशांच्या समस्या मांडल्या.

सलग दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राच राजकारण चर्चेत

वर्षा मेहता
। अलिबाग ।

शिवसेनेने आज सांगितले की ते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबतच्या महाराष्ट्र आघाडीतून बाहेर पडण्याचा विचार करतील; परंतु बंडखोर २४ तासांत परत आले तरच. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर गटाने अधिक संख्या मिळवल्यामुळे मोठी चढाई झाली. सुमारे ४१ आमदारांसह गुवाहाटीत तळ ठोकून असलेल्या एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेससोबतची युती तोडण्याची मागणी केली असून, गेल्या अडीच वर्षांत शिवसेनेच्या नेत्यांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागला आहे.

बंडखोर आमदारांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांवर आपले दरवाजे बंद करून तासन्तास वाट पाहात बसावे लागत असल्याचा आरोपही केला आहे. बंडखोरांसह गुवाहाटीमधील एक आमदार संजय शिरसाट यांनी लिहिले की, आम्हाला मुख्यमंत्र्यांच्या घरी अडीच वर्षे प्रवेश नाकारण्यात आला. काँग्रेस आणि शरद पवार यांच्या पक्षाने-महाराष्ट्रातील शिवसेनेचे सहयोगी-सत्ताधारी युतीच्या प्रचंड राजकीय संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणून मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांचे नाव सुचवले होते.

भाजपचे म्हणणे आहे की, महाराष्ट्रातील राजकीय पेच हा शिवसेनेचा अंतर्गत मामला आहे आणि पक्ष राज्यात सरकार स्थापनेचा दावा करत नाही. आम्ही एकनाथ शिंदे यांच्याशी बोललो नाही. हा शिवसेनेचा अंतर्गत विषय आहे. भाजपचा याच्याशी काहीही संबंध नाही. आम्ही सरकार स्थापनेचा दावा करत नाही, असे केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी म्हटले असून, त्यांनी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

रेल्वे टीसींच्या सतर्कतेमुळे मायलेकरांची भेट

मुलांच्या भेटीने आईला अश्रू अनावर; चिपळूण स्टेशनमध्ये झाली होती ताटातूट

। पनवेल । वार्ताहर ।

भुकेने कासावीस झालेल्या आपल्या चिमुकल्याने खाऊ आणण्यासाठी आई गाडीतून खाली उतरली. दरम्यान, गाडी सुरू झाली आणि माय-लेकरांची ताटातूट झाली. परंतु, रेल्वे तपासनीसांच्या सतर्कतेमुळे काही तासातच आपल्या मुलांची भेट घडवून आणताच आईच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.

याबाबत हकीकत अशी की, नागरकॉईल गांधीधाम ट्रेनने (ट्रेन नं.१६३३६) दोन लहानगी मुलं आणि त्यांची आई अलवा ते अहमदाबाद असा प्रवास करीत होते. सदर ट्रेनने चिपळूण रेल्वे स्टेशन सोडले आणि गाडी पनवेलच्या दिशेने धावू लागली. यावेळी सदर गाडीमध्ये रत्नागिरी ते पनवेल असे तिकीट तपासनीस म्हणून कार्यरत असलेले के.के. कापसे व प्रदीप शिर्के आपले काम करीत असताना त्यांना आढळून आले, की दोन लहान मुले गाडीत बसले असून ती रडत आहेत. यावेळी त्यांनी मुलांकडे जाऊन त्यांची विचारपूस केली असता, चिपळूण येथे गाडी थांबली तेव्हा त्यांना दूध बिस्किट्स आणण्यासाठी आई गाडीमधून उतरून फलाटावर असलेल्या स्टॉलवर गेली; परंतु दरम्यान गाडीने चिपळूण सोडले आणि त्या मुलांची आई स्टेशनवरच राहिली. या घटनेमुळे ती मुले भांबावून गेली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात येताच तिकीट तपासनीस कापसे यांनी झालेली घटना रेल्वेच्या बेलापूर कंट्रोल रूमशी संपर्क साधून चिपळूण स्टेशन मास्टर कार्यालयात कल्पना दिली. दरम्यान, त्यांनी मुलांना धीर देऊन खानपान सेवा नसलेल्या गाडीत स्वतः आणि प्रवाशांच्या मदतीने त्या मुलांची खाण्या-पिण्याची व्यवस्था केली.

दरम्यान, चिपळूण स्टेशन मास्टर यांनी त्या महिलेला मागून येणाऱ्या जनशताब्दी (गाडी क्र. १२०५२) या गाडीत बसवून दिल्याची माहिती कापसे यांना दिला. कापसे आणि शिर्के यांनी याबाबत पनवेल आरपीएफला कळवून त्या बालकांना त्यांच्या स्वाधीन केले. काही तासातच पाठोपाठ जनशताब्दी ट्रेनने आलेल्या त्या मुलांच्या आईच्या ताब्यात ती दोन्ही मुले स्वाधीन करण्यात आली. काही तासांकरिता ताटातूट झालेल्या मायलेकरांची भेट तिकीट तपासनीसांच्या सतर्कतेमुळे घडवून आणली गेली आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)